RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष १०, अंक ३(४)] शुक्रवार, जानेवारी १९, २०२४/पौष २९, शके १९४५ [पृष्ठे ३३, किंमत : रुपये २३.००

## असाधारण क्रमांक ९

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८.—** महाराष्ट्र राज्यातील स्वयं-अर्थसहाय्यित खाजगी विद्यापीठांशी संबंधित असणाऱ्या कायद्यांचे एकीकरण, एकत्रीकरण व सुधारणा करण्यासाठी आणि राज्यातील उच्च शिक्षणाचा विकास व अभिवृद्धी करण्याकरिता राज्यातील स्वयं-अर्थसहाय्यित खाजगी विद्यापीठांची स्थापना, विधिसंस्थापन व विनियमन करण्याकरिता आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्यासाठी कायदा अधिनियमित करण्यासाठी अधिनियम. | १—३३ |

दिनांक १८ जानेवारी २०२४ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**सतिश वाघोले,**
सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

### सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८.

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर “ **महाराष्ट्र शासन राजपत्रात** ” दिनांक १९ जानेवारी २०२४ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र राज्यातील स्वयं-अर्थसहाय्यित खाजगी विद्यापीठांशी संबंधित असणाऱ्या कायद्यांचे एकीकरण, एकत्रीकरण व सुधारणा करण्यासाठी आणि राज्यातील उच्च शिक्षणाचा विकास व अभिवृद्धी करण्याकरिता राज्यातील स्वयं-अर्थसहाय्यित खाजगी विद्यापीठांची स्थापना, विधिसंस्थापन व विनियमन करण्याकरिता आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्यासाठी कायदा अधिनियमित करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्यातील स्वयं-अर्थसहाय्यित खाजगी विद्यापीठांशी संबंधित असणाऱ्या कायद्यांचे एकीकरण, एकत्रीकरण व सुधारणा करण्यासाठी आणि राज्यातील उच्च शिक्षणाचा विकास व अभिवृद्धी

करण्याकरिता राज्यातील स्वयं-अर्थसहाय्यित खाजगी विद्यापीठांची स्थापना, विधिसंस्थापन व विनियमन करण्याकरिता आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्यासाठी कायदा अधिनियमित करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ. **१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२३, असे म्हणावे.

(२) तो, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमून देईल अशा दिनांकास, अंमलात येईल.

व्याख्या. **२.** या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,—

(क) " विद्या परिषद " याचा अर्थ, विद्यापीठाची विद्यापरिषद, असा आहे ;

(ख) " संलग्न प्राध्यापक ", " संलग्न सहयोगी प्राध्यापक " किंवा " संलग्न सहायक प्राध्यापक " यांचा अर्थ, विद्यापीठाबरोबरच्या सहयोगाच्या किंवा साहचर्याच्या कालावधीत जी तशी पदनिर्देशित केली आहे अशी उद्योग, व्यापार, कृषी, वाणिज्य, सामाजिक, सांस्कृतिक, विद्याविषयक किंवा इतर कोणत्याही संलग्न क्षेत्रांमधील व्यक्ती, असा आहे ;

(ग) " प्राधिकरणे " याचा अर्थ, या अधिनियमात किंवा त्याअन्वये विनिर्दिष्ट केलेली विद्यापीठाची प्राधिकरणे, असा आहे ;

(घ) " व्यवस्थापन मंडळ " याचा अर्थ, या अधिनियमाच्या कलम २८ अन्वये घटित केलेले व्यवस्थापन मंडळ, असा आहे ;

(ङ) " विद्यापीठ परिसर " याचा अर्थ, ज्या क्षेत्रात विद्यापीठ स्थापन केले आहे ते विद्यापीठाचे क्षेत्र, असा आहे ;

(च) " उत्कृष्टता केंद्र " याचा अर्थ, विद्यार्थी, सेवेतील कर्मचारी, काम करणारे व्यावसायिक यांना सर्व प्रकारची संबंधित कौशल्ये पुरविण्यासाठी आणि संयुक्त प्रकल्प हाती घेण्यासाठी उद्योगाच्या सहयोगाने किंवा उद्योग व समाजाच्या लाभासाठी स्थापन केलेले अद्ययावत प्रशिक्षण किंवा संशोधन केंद्र, असा आहे ;

(छ) " दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण " याचा अर्थ, प्रक्षेपण, दूरप्रक्षेपण, पत्रव्यवहाराद्वारे पाठ्यक्रम, चर्चासत्रे, संपर्क कार्यक्रम किंवा असे इतर कोणतेही पद्धतीशास्त्र यांसारख्या संज्ञापनाच्या कोणत्याही दोन किंवा अधिक संयुक्त माध्यमांद्वारे देण्यात येणारे शिक्षण, असा आहे ;

(ज) " कर्मचारी " याचा अर्थ, विद्यापीठाने नियुक्त केलेली कोणतीही व्यक्ती, असा आहे आणि त्यामध्ये, विद्यापीठाचे अध्यापक, अधिकारी व इतर कर्मचारीवर्ग यांचा समावेश होतो ;

(झ) " विद्यमान विद्यापीठ " याचा अर्थ, अनुसूचीच्या भाग-एक मध्ये विनिर्दिष्ट केलेले विद्यापीठ, असा आहे ;

(ञ) " तज्ञ समिती " याचा अर्थ, या अधिनियमाअन्वये घटित केलेल्या महाराष्ट्रातील नवीन खाजगी विद्यापीठांच्या आस्थापनेस चालना देण्यासाठी, सुविधा पुरविण्यासाठी व सहाय्य करण्यासाठी, शासनाने अधिसूचित केलेल्या विख्यात व्यक्तींची समिती, असा आहे ;

(ट) " विद्याशाखा " याचा अर्थ, विद्यापीठाची विद्याशाखा, असा आहे ;

(ठ) " शुल्क " याचा अर्थ, विद्यापीठाने किंवा त्याची महाविद्यालये, परिसंस्था किंवा, यथास्थिति, अभ्यास केंद्रे यांनी, विद्यार्थ्यांकडून संकलित केलेली, परतावायोग्य नसलेली, कोणत्याही नावाने संबोधण्यात येईल अशी रक्कम, असा आहे ;

(ड) " शासन " किंवा " राज्य शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(ढ) " नियामक मंडळ " याचा अर्थ, या अधिनियमाच्या कलम २७ अन्वये घटित केलेले नियामक मंडळ, असा आहे ;

(ण) " उच्च शिक्षण " याचा अर्थ, उच्च माध्यमिक शालेय शिक्षणाच्या टप्प्यावरील शिक्षणानंतरचा ज्ञानाचा व्यासंग, असा आहे ;

(त) " वसतिगृह " याचा अर्थ, विद्यापीठाने स्थापन केलेले किंवा मान्यता दिलेले असे, विद्यापीठाच्या किंवा त्याच्या परिसंस्थांच्या आणि अभ्यासकेंद्रांच्या विद्यार्थ्यांसाठी असलेले निवासस्थान, असा आहे ;

(थ) " अधिसूचना " याचा अर्थ, **शासकीय राजपत्रात,** प्रसिद्ध केलेली अधिसूचना, असा आहे ;

(द) " **शासकीय राजपत्र** " याचा अर्थ, **महाराष्ट्र शासनाचे राजपत्र,** असा आहे ;

(ध) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमाद्वारे किंवा त्यान्वये केलेले नियम, परिनियम, आदेश किंवा, यथास्थिति, विनियमयांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(न) " अध्यक्ष " याचा अर्थ, विद्यापीठाचा अध्यक्ष, असा असून जो विद्यापीठाचा कुलपती देखील असेल ;

(प) " विनियामक मंडळ " याचा अर्थ, उच्च शिक्षणाचा विद्याविषयक दर्जा सुनिश्चित करण्याची, मानके व शर्ती निर्धारित करण्याकरिता केंद्र सरकारने स्थापन केलेले, विद्यापीठ अनुदान आयोग, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद, राष्ट्रीय वैद्यक आयोग, भारतीय औषधनिर्माणशास्त्र परिषद, राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषद, भारतीय कृषि संशोधन परिषद, दूरस्थ शिक्षण परिषद, भारतीय वैज्ञानिक व संशोधन परिषद, इत्यादींसारखे मंडळ, असा आहे, आणि त्यात शासनाचा समावेश होतो ;

(फ) " नियम " याचा अर्थ, राज्य शासनाने विहित केलेले नियम, असा आहे ;

(ब) " अनुसूची " याचा अर्थ, या अधिनियमास जोडलेली अनुसूची, असा आहे ;

(भ) " कलम " याचा अर्थ, या अधिनियमाचे कलम, असा आहे ;

(म) या अधिनियमाखाली स्थापन केलेल्या विद्यापीठाच्या संबंधात, " प्रायोजक मंडळ " याचा अर्थ,—

१८६० चा २१. (एक) सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये नोंदणी केलेली सोसायटी ; किंवा

१९५० चा २९. (दोन) महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियमान्वये नोंदणी केलेला सार्वजनिक न्यास ; किंवा

१९५६ चा १. २०१३ चा ८. (तीन) कंपनी अधिनियम, १९५६ याच्या कलम २५ अन्वये स्थापन केलेली कोणतीही शैक्षणिक संस्था किंवा कंपनी अधिनियम, २०१३ अन्वये नोंदणी केलेली कंपनी,

असा आहे ;

(य) "राज्य " याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य, असा आहे ;

(यक) " परिनियम ", " आदेश " किंवा " विनियम " यांचा अर्थ, अनुक्रमे, या अधिनियमान्वये विहित केलेले विद्यापीठाचे परिनियम, आदेश किंवा विनियम, असा आहे ;

(यख) " विद्यार्थी " याचा अर्थ, संशोधन पदवीसह, विद्यापीठाने सुरू केलेल्या पदवी, पदविका किंवा अन्य विद्याविषयक विशेषोपाध्या यांचा अभ्यास पाठ्यक्रम घेण्यासाठी विद्यापीठात नावनोंदणी केलेली व्यक्ती, असा आहे ;

(यग) " अभ्यास केंद्र " याचा अर्थ, दूरस्थ शिक्षणाच्या संदर्भात विद्यार्थ्यांना सल्ला देणे, त्यांचे समुपदेशन करणे किंवा विद्यार्थ्यांना आवश्यक असलेले इतर कोणतेही सहाय्य देण्याच्या प्रयोजनाकरिता विद्यापीठाने स्थापन केलेले व चालविलेले किंवा मान्यता दिलेले केंद्र, असा आहे ;

(यघ) " अध्यापक " याचा अर्थ, विद्यापीठाच्या अभ्यास पाठ्यक्रमाला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी किंवा संशोधनात मार्गदर्शन करण्यासाठी किंवा कोणत्याही स्वरूपात मार्गदर्शन करण्यासाठी आवश्यक असलेले प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहायक प्राध्यापक, संलग्न प्राध्यापक किंवा इतर कोणतीही व्यक्ती, असा आहे ;

(यङ) " विद्यापीठ " याचा अर्थ, अनुसूचीमध्ये नमूद केलेले स्वयं-अर्थसहाय्यित खाजगी विद्यापीठ, असा आहे.

विद्यापीठाची स्थापना करण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल.

**३.** (१) या अधिनियमान्वये स्वयं-अर्थसहाय्यित खाजगी विद्यापीठ स्थापन करण्यास इच्छुक असणारे कोणतेही प्रायोजक मंडळ (शैक्षणिक कार्य करणाऱ्या कोणत्याही खाजगी परिसंस्थेसह), विद्यापीठाची स्थापना करण्याचा प्रस्ताव अंतर्भूत असणाऱ्या सविस्तर प्रकल्प अहवालासह अर्ज, नियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशा प्रक्रिया शुल्कासह, शासनास सादर करील.

(२) सविस्तर प्रकल्प अहवालात पुढील तपशिलांचा अंतर्भाव असेल :—

(एक) पोट-कलम (१) अन्वये अर्ज सादर करणाऱ्या प्रायोजक मंडळाचे नोंदणी प्रमाणपत्र, त्याची घटना व त्याचे उप-विधी यांच्या प्रतींसह त्याची तपशिलवार माहिती ;

(दोन) शैक्षणिक कार्यक्रम चालविणाऱ्या विद्यमान खाजगी संस्थांच्या बाबतीत मागील तीन वर्षांच्या लेखापरीक्षित लेख्यांसह प्रायोजक मंडळाच्या आर्थिक साधन स्रोतांसंबंधीची माहिती किंवा नव्याने स्थापन झालेल्या प्रायोजक मंडळाच्या बाबतीत सनदी लेखापालाकडून यथोचितरीत्या प्रमाणित करण्यात आलेली आर्थिक साधनस्रोत निर्माण करण्यासाठीची योजना ;

(तीन) प्रस्तावित विद्यापीठाचे नाव, ठिकाण आणि मुख्यालय ;

(चार) विद्यापीठाची उद्दिष्टे ;

(पाच) स्थानिक आणि राज्यस्तरीय संस्था यांना लागू असलेल्या विनियमांचे अनुपालन करून, जमिनीची उपलब्धता तसेच इमारती व पायाभूत सुविधा असतील तर, त्यांचे तपशील; किंवा जमीन संपादनाकरिता, इमारतीच्या बांधकामाकरिता व पायाभूत सुविधा प्रस्थापित करण्याकरिता बृहत् योजना ;

(सहा) अध्यापक व अध्यापकेतर कर्मचारी कोणतेही असल्यास त्यांच्यासह, प्रायोजक मंडळाकडे कामाचा निपटारा करण्यासाठी असलेली प्रस्तावित योजना व विद्याविषयक सुविधांची उपलब्धता ;

(सात) विद्यापीठ कार्यरत होण्यापूर्वी इमारती बांधणे, संरचनात्मक सोयींचा व पायाभूत सुविधांचा विकास करणे आणि साधनसामग्री मिळविणे, इत्यादी, यांसारख्या विद्यापीठ परिसर विकासाच्या योजनांचा तपशील आणि पहिल्या पाच वर्षांमधील कार्यक्रमांची टप्पानिहाय रुपरेषा ;

(आठ) पुढील पाच वर्षांसाठी प्रस्तावित केलेल्या भांडवली खर्चाचा टप्पानिहाय विनियोग आणि त्याचे वित्तीय स्रोत ;

(नऊ) विद्यापीठाने हाती घेण्याचे प्रस्तावित केलेल्या, अभ्यास आणि संशोधन अध्ययनक्रमांचेस्वरुप व प्रकार आणि राज्याची विकासविषयक उद्दिष्टे व रोजगारविषयक गरजा यांच्या संदर्भात असलेली त्यांची प्रासंगिकता आणि पहिल्या पाच वर्षांमधील, अशा कार्यक्रमांचे पाठ्यक्रमनिहाय प्रवेश लक्ष्यांसह टप्पानिहाय रुपरेषा ;

(दहा) प्रायोजक मंडळाच्या अधिपत्याखाली असणाऱ्या संबंधित विद्याशाखांतील अनुभवी व तज्ज्ञ व्यक्ती ;

(अकरा) देण्यात येणाऱ्या सुविधा, अभ्यासक्रम व संशोधन कार्य, हे सुरू करण्याचे प्रस्तावित केले असेल तर त्यांचे स्वरूप ;

(बारा) अभ्यासक्रमनिहाय किंवा उपक्रमनिहाय अंदाजित आवर्ती खर्च, वित्तीय स्त्रोत आणि प्रत्येक विद्यार्थ्यांवरील अंदाजित खर्च ;

(तेरा) साधनसंपत्तीचे एकत्रीकरण करण्याची योजना, त्यासाठी येणारा भांडवली खर्च आणि अशा साधनसंपत्तीच्या परतफेडीची रीत ;

(चौदा) विद्यार्थ्यांकडून वसूल केले जाणारे शुल्क, विद्यापीठाच्या उद्दिष्टांशी संबंधित असलेल्या सल्लाविषयक सेवांकडून आणि इतर उपक्रमांकडून अपेक्षित असलेला महसूल आणि अन्य अपेक्षित उत्पन्न यांच्यामार्फत अंतर्गतरीत्या निधी उभारण्यासाठी केलेली योजना ;

(पंधरा) विशेष तरतुदींद्वारे आणि यासंबंधातील सकारात्मक कृतींद्वारे राज्यातील रहिवासी असलेल्या समाजातील दुर्बल घटकांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी आधारभूत योजना ;

(सोळा) विद्यापीठातील अभ्यासक्रमांसाठी प्रवेश देण्यासाठी विद्यार्थ्यांची निवड करण्यासाठी अनुसरावयाची प्रस्तावित प्रणाली ;

(सतरा) स्थानिक गरजांच्या संबंधातील अध्ययनक्रमाचे स्वरुप आणि प्रस्तावित विद्यापीठाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विद्यापीठाने हाती घ्यावयाचे विशेषीकृत अध्यापन, प्रशिक्षण किंवा संशोधनविषयक उपक्रमांचे स्वरूप ;

(अठरा) विद्यापीठाने शेतकरी, शेतमजूर, इतर कामगार, महिला आणि उद्योग यांच्या लाभासाठी काही अध्ययनक्रम सुरू करण्याचे प्रस्तावित केले आहे किंवा कसे, असल्यास, त्याचा तपशील द्यावा ;

(एकोणीस) खेळ, क्रीडा आणि राष्ट्रीय छात्रसेना (एन सी सी), राष्ट्रीय सेवा योजना (एन एस एस), इत्यादींसारख्या पाठ्येतर उपक्रमांसाठी उपलब्ध असलेली किंवा निर्माण करण्याचे प्रस्तावित केलेली क्रीडांगणे व इतर सुविधा यांचा तपशील ;

(वीस) विद्याविषयक मूल्यमापन करण्यासाठी प्रस्तावित केलेली व्यवस्था ;

(एकवीस) प्रस्तावित विद्यापीठ स्थापन करण्याच्या आवश्यकतेचे समर्थन ;

(बावीस) विनियामक मंडळांच्या मानकांचे पालन करण्याची बांधिलकी ;

(तेवीस) प्रायोजक मंडळास देणे आवश्यक वाटेल असे अन्य तपशील ;

(चोवीस) विहित करण्यात येतील असे अन्य तपशील.

सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करणे व त्याची तपासणी करणे.

**४.** (१) प्रायोजक मंडळाकडून सविस्तर प्रकल्प अहवालासह (डीपीआर) विद्यापीठाची स्थापना करण्याचा प्रस्ताव अंतर्भूत असलेला अर्ज प्राप्त झाल्यावर, शासनाने आदेशाद्वारे घटित केलेली छाननी समिती, पुढील कारणांच्या आधारे प्रस्तावाची व सविस्तर प्रकल्प अहवालाची छाननी करील :—

(क) प्रायोजक मंडळाची आर्थिक सुस्थिती आणि मत्ता तसेच प्रस्तावित विद्यापीठाच्या पायाभूत सुविधा उभारण्यासाठी त्याच्याकडे असलेली क्षमता ;

(ख) प्रायोजक मंडळाची पार्श्वभूमी, म्हणजेच शिक्षण क्षेत्रातील मंडळाची विशेष तज्ञता व अनुभव, त्याचा सर्वसाधारण लौकिक, इत्यादी आणि विनियामक मंडळाची मानके अनुसरण्याची त्याची बांधिलकी ;

(ग) विनियामक मंडळांच्या शैक्षणिक धोरणानुसार, प्रस्तावित केलेला शैक्षणिक कार्यक्रम, संशोधन व नवोपक्रम उपक्रम, अभ्यासक्रम तयार करणे याबाबत प्रायोजक मंडळाचे सामर्थ्य व क्षमता म्हणजेच, प्रस्तावित विद्यापीठाच्या उद्दिष्टांमध्ये निश्चित केल्यानुसार अध्ययनक्रमाच्या नाविन्यतेसह ; समकालीन गरजांनुसार मनुष्यबळ विकसित करण्याची शैक्षणिक कार्यक्रमांची सक्षमता ;

(घ) संबंधित विनियामक मंडळाने विर्निदिष्ट केलेल्या शैक्षणिक मानकांशी अनुरूप असलेला प्रस्ताव ;

(ङ) या बाबतीत शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशाच्या अनुरूप प्रस्ताव आहे किंवा कसे.

(२) पोट-कलम (१) खालील प्रस्ताव व प्रकल्प अहवाल यांची छाननी करताना, छाननी समितीस, प्रायोजक मंडळाकडून, योग्य वाटेल अशी अन्य माहिती मागविता येईल.

(३) समिती, कोणत्याही असल्यास, सूचनांसह तिचा अहवाल, विचारार्थ शासनाला सादर करील.

इरादापत्र देणे आणि अनुपालन अहवाल.

**५.** (१) कलम ४ अन्वये घटित केलेल्या समितीचा अहवाल मिळाल्यानंतर जर विद्यापीठ स्थापन करणे उचित असल्याबाबत राज्य शासनाची खात्री पटली तर, त्यास प्रायोजक मंडळाला इरादापत्र देता येईल ; आणि पुढील बाबी करण्यास फर्मावता येईल :—

(क) कलम १३ च्या तरतुदींनुसार दाननिधी स्थापन करणे ;

(ख) नियमांद्वारे विहित केलेल्या मानकांनुसार किमान जागेची प्रायोजक मंडळाची मालकी व कब्जा दर्शविणारे हक्क विलेख सादर करणे ;

(ग) विद्यापीठ अनुदान आयोग किंवा कायद्याद्वारे स्थापन केलेले अन्य कोणतेही विनियामक मंडळ विनिर्दिष्ट करील अशा इतर शर्तींची पूर्तता करणे आणि विहित करील अशी अन्य माहिती पुरविणे ;

(घ) जर यापूर्वी उपलब्ध करण्यात आले नसेल तर, नियमांद्वारे विहित केलेल्या मानकांनुसार प्रशासनिक प्रयोजनांसाठी आणि विद्याविषयक कार्यक्रम आयोजित करण्यासाठी व्याप्तक्षेत्राचे बांधकाम करणे ;

(ङ) विनियामक मंडळाने निर्धारित केलेल्या मानकांनुसार विद्यापीठाने सुरू करावयाच्या प्रत्येक विभागात किंवा विद्याशाखेमध्ये आवश्यक सहायक कर्मचाऱ्यांसह प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक आणि पुरेशा संख्येतील सहायक प्राध्यापक नियुक्त करण्याची हमी देणे ;

(च) विनियामक मंडळाने घालून दिलेल्या मानकाप्रमाणे विद्यार्थ्यांच्या हिताकरिता चर्चासत्र, वादविवाद करणे, सामान्य ज्ञान तपासणी कार्यक्रमासारखे अभ्यासक्रमाला पूरक असे कार्यक्रम आणि खेळ, क्रीडा, राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.), राष्ट्रीय छात्र सेना (एन.सी.सी.), इत्यादींसारखे पाठ्येत्तर कार्यक्रम हाती घेण्याची हमी देणे ;

(छ) विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांसाठी भविष्यनिर्वाह निधी स्थापन करण्याची आणि त्यांच्यासाठी कल्याणकारी कार्यक्रम हाती घेण्याची हमी देणे ;

(ज) विनियामक मंडळाकडून निर्धारित करण्यात येईल अशी किंवा नियमाद्वारे विहित करण्यात येईल अशी इतर माहिती पुरविणे आणि अशा पायाभूत सुविधा व इतर आवश्यकता यांच्या अशा शर्तींची पूर्तता करणे.

(२) प्रायोजक मंडळ, पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या आवश्यकतांची आणि शर्तींची पूर्तता करील आणि इरादापत्र दिल्याच्या दिनांकापासून जास्तीत जास्त एक वर्षाच्या कालावधीत अनुपालन अहवाल शासनाला सादर करील. शासनास, उक्त कालावधी, आदेशाद्वारे अपवादात्मक परिस्थितीत, त्यामध्ये विनिर्दिष्ट केलेले शुल्क प्रदान केल्यावर वाढविता येईल.

(३) प्रायोजक मंडळाकडून अनुपालन अहवाल प्राप्त झाल्यावर, शासन, अनुपालन अहवालांची पडताळणी करण्यासाठी आदेशाद्वारे एक पडताळणी समिती नियुक्त करील.

(४) पडताळणी समिती, पोट-कलम (१) मध्ये निर्धारित केलेल्या आवश्यकतांची व शर्तींची प्रायोजक मंडळाने पूर्तता केली आहे किंवा कसे हे विनिर्दिष्ट करणारा तिचा अहवाल तिच्या नियुक्तीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत शासनाला सादर करील. शासनाला, उक्त समितीने अहवाल सादर करण्याचा कालावधी, जास्तीत जास्त तीन महिन्यांपर्यंत वाढविता येईल.

(५) जर प्रायोजक मंडळाने, पोट-कलम (१) च्या तरतुदीचे पालन करण्यात कसूर केली तर, कलम ३ अन्वये प्रायोजक मंडळाने सादर केलेला प्रस्ताव, फेटाळण्यात येईल आणि पोट-कलम (१) अन्वये दिलेले इरादा पत्र काढून घेण्यात आले असल्याचे मानण्यात येईल.

विद्यापीठाची स्थापना व विधिसंस्थापन.

**६.** (१) शासन, कलम ५ च्या पोट-कलम (४) अन्वये पडताळणी समितीने सादर केलेला अहवाल विचारात घेतल्यानंतर, प्रायोजक मंडळाने कलम ५ मधील तरतुदींचे अनुपालन केले आहे, याबाबत खात्री पटली असेल तर, खाजगी विद्यापीठाचे व त्याच्या प्रायोजक मंडळाचे नाव, ठिकाण व मुख्यालय, राज्य विधानमंडळाद्वारे कायदा अधिनियमित करून केलेल्या सुधारणेद्वारे अनुसूचीच्या भाग दोनमध्ये समाविष्ट करून, खाजगी विद्यापीठ स्थापन करण्यास परवानगी देईल.

(२) अध्यक्ष आणि कुलगुरू आणि नियामक मंडळ, व्यवस्थापन मंडळ व विद्यापरिषद यांचे सदस्य आणि यानंतर ज्या व्यक्ती, असे अधिकारी किंवा सदस्य होतील अशा सर्व व्यक्ती, जोपर्यंत त्या असे पद किंवा

सदस्यत्व धारण करीत राहतील तोपर्यंत त्या व्यक्ती, याद्वारे, अनुसूचीमध्ये त्यांच्यासाठी विनिर्दिष्ट केलेल्या नावाचा एक निगम निकाय म्हणून घटित व घोषित करण्यात येत आहे.

(३) अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या विद्यापीठांची अखंड परंपरा व सामाईक मोहोर असेल आणि त्यास किंवा त्याच्याविरुद्ध त्याच नावाने दावा दाखल करता येईल.

(४) अनुसूचीच्या भाग एकच्या अनुक्रमे, स्तंभ (२) व स्तंभ (४) यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या विद्यमान प्रत्येक विद्यापीठाच्या व त्याच्या प्रायोजक मंडळाच्या संबंधात, उक्त भागाच्या स्तंभ (३) मध्ये त्यांच्या समोर विनिर्दिष्ट केलेले नाव, ठिकाण व मुख्यालये असलेले तत्सम विद्यापीठ, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकाच्या लगतपूर्वी ज्या उद्दिष्टांसाठी घटित केले होते त्या उद्दिष्टांसाठी, या अधिनियमाअन्वये स्थापन झाले असल्याचे मानण्यात येईल आणि या अधिनियमाच्या तरतुदी, अशा विद्यापीठास लागू असतील.

(५) विद्यापीठ, या अधिनियमान्वये स्थापन केलेले असंलग्न एकात्म विद्यापीठ म्हणून कार्य करील आणि त्यात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना पदवी, पदविका किंवा प्रमाणपत्र प्रदान करण्यासाठी किंवा बहाल करण्यासाठी इतर कोणत्याही महाविद्यालयाला किंवा परिसंस्थेला संलग्न असणार नाही.

(६) प्रत्येक विद्यापीठ त्याच्या स्थापनेपासून पाच वर्षांच्या आत राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषद (नॅक) किंवा राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळाकडून अधिस्वीकृती प्राप्त करील.

(७) प्रत्येक विद्यापीठाने सातत्यपूर्ण अंतर्गत हमी प्रक्रिया आणि नियतकालिके बाह्य सूक्ष्म पुनरिक्षण करण्याकरिता राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेने आवश्यक केल्याप्रमाणे एक अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष स्थापन करील. गुणवत्ता अहवाल शासनाला सादर करण्यात येतील.

सचिवस्तरीय समिती.

**७.** (१) विद्यापीठाच्या स्थापनेनंतर, प्रायोजक मंडळ, त्याने सादर केलेल्या हमींचे आणि इरादापत्रामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या विद्यापीठाच्या कार्यान्वयनाशी संबंधित असणाऱ्या शर्तींचे आणि या अधिनियमाच्या तरतुदींचे व त्याखाली केलेल्या नियमांचे प्रायोजक मंडळ अनुपालन करीत आहे किंवा कसे याची पडताळणी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वित्त विभाग आणि नियोजन विभाग यांचा समावेश असलेली एक सचिवस्तरीय समिती करील.

(२) पोट-कलम (१) खालील समिती, तिचा अहवाल शासनाला सादर करील.

(३) पोट-कलम (२) खालील अहवाल प्राप्त झाल्यावर, राज्य शासन, विद्यापीठाच्या कार्यान्वयनास परवानगी देणारी अधिसूचना **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध करील.

(४) विद्यापीठ, पोट-कलम (३) अन्वये अधिसूचना काढल्यानंतरच केवळ विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

सचिवस्तरीय समितीद्वारे निरीक्षण.

**८.** या अधिनियमाच्या कलम ७ च्या पोट-कलम (१) अन्वये स्थापना केलेल्या सचिवस्तरीय समितीस, शासनाने निदेश दिलेले असतील तेव्हा व तसे विद्यापीठाचे निरीक्षण करता येईल आणि स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठांच्या आस्थापनेशी संबंधित असणाऱ्या शर्तींचे अनुपालन केल्याची आणि अशी समिती, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या संबंधित कायद्यांच्या तरतुदींचे अनुपालन केल्याची पडताळणी व सुनिश्चिती देखील करील.

विद्यापीठाची उद्दिष्टे.

**९.** (१) विद्यापीठाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे असतील :—

(क) अभियांत्रिकी, तंत्रज्ञान, व्यवस्थापन, विधि, व्यवसाय व वाणिज्य, उपयोजित व सृजनात्मक कला, व्यवसाय शिक्षण, प्रसारमाध्यम, माहिती व दळणवळण तंत्रज्ञान व मूलभूत शिक्षण आणि त्यांचा आंतरविद्याशाखीय, बहुविद्याशाखीय अभ्यासक्रम व विकास यांसारख्या मुक्त कला, मानव्य विद्या, सामाजिक शास्त्रे, जीवन शास्त्रे व जैव तंत्रज्ञाने, अतिसूक्ष्म (नॅनो) शास्त्रे व तंत्रज्ञाने, व्यावसायिक विद्याशाखा यांचा अंतर्भाव असलेले उच्च व तंत्र शिक्षणामधील अध्ययन करणे, अध्यापन करणे, क्षमता, कर्तृत्व व कौशल्य विकास करणे आणि संशोधन व विकास करणे ;

(ख) उच्च व तंत्र शिक्षण, कला, क्रीडा, संस्कृती, चित्रपट, अवकाश तंत्रज्ञान, सागरी संशोधन या विषयांमधील शिक्षण, अध्यापन व प्रशिक्षण देणे आणि संशोधनासाठी तरतुदी करणे ;

(ग) उच्चस्तरीय बोधात्मक, भावात्मक व मनोकारक (मस्तक, हृदय व हस्त) क्षमता निर्माण करणे ;

(घ) उच्चस्तरीय बौद्धिक क्षमता निर्माण करणे ;

(ङ) विकास व सामाजिक पुनर्रचना आणि परिवर्तन यांचे नवीन मार्ग शोधण्यासाठी सर्जनशीलता, अभिनव उपक्रम व उद्यमशीलता यांना चालना देण्यासाठी नवीन शैक्षणिक कार्यक्रम निर्माण करणे आणि त्यांचे उपयोजन करणे ;

(च) शिक्षण व विकास यांसाठी अत्याधुनिक सुविधा प्रस्थापित करणे ;

(छ) अध्यापन व संशोधन करणे आणि निरंतर गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे कार्यक्रम उपलब्ध करून देणे ;

(ज) विज्ञान व तंत्रज्ञान यामध्ये संशोधन व विकास करण्याकरिता आणि सामाजिक-आर्थिक विकास करण्यासाठी आणि ज्ञानाचे आदानप्रदान व उपयोजन करण्याकरिता उत्कृष्टता केंद्रांची निर्मिती करणे ;

(झ) एकविसाव्या शतकामध्ये, व्यक्ती व समाज यांच्यासाठी अध्ययन, अध्यापन, संशोधन, मूल्यमापन, विकास, संघटन करण्याचे आणि सामाजिक-आर्थिक संपत्तीची निर्मिती करण्याचे नियमन व व्यवस्थापन करण्यासाठी आधुनिक व आधुनिकेतर प्रक्रिया, यंत्रणा व तंत्रज्ञान यांचा वापर करणे ;

(ञ) उद्योग आणि सार्वजनिक संघटना व समाज यांना व्यावसायिक व विकासविषयक सेवा पुरविणे ;

(ट) अभिनव दृष्टिकोन असलेल्या नवीन व उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये उच्च शिक्षण अध्ययनक्रम, पाठ्यक्रम सुरू करणे ;

(ठ) भारतातील व परदेशातील इतर उच्च शिक्षण व संशोधन संस्थांशी संबंध, सहयोग व भागीदारी प्रस्थापित करणे ;

(ड) परीक्षांच्या किंवा मूल्यमापनाच्या अन्य कोणत्याही पद्धतीच्या आधारे पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे व इतर विद्याविषयक विशेषोपाध्या सुरू करणे ;

(ढ) सर्जनशीलता व उद्यमशीलता यांचे परिपोषण व अभिवृद्धी करण्यासाठी विद्याविषयक संरचना, अध्ययन कालमर्यादा आणि क्रियाशील व निरंतर मूल्यमापन प्रक्रिया यांमध्ये एकसंधता निर्माण करण्याकरिता अभिनव दृष्टिकोन प्रस्थापित करणे ;

(ण) शासनाद्वारे सुचविण्यात येतील अशा अन्य कोणत्याही उद्दिष्टांचा पाठपुरावा करणे ;

(त) विद्यापीठाने प्रदान केलेल्या पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे व इतर विद्याविषयक विशेषोपाध्या,
अखिल भारतीय तंत्रशिक्षण अधिनियम, १९८७ अन्वये स्थापन केलेल्या अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने १९८७ चा ५२.
किंवा राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद अधिनियम, १९९३ अन्वये स्थापन केलेल्या राष्ट्रीय अध्यापक शिक्षण १९९३ चा ७३.
परिषदेने किंवा विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम, १९५६ अन्वये घटित केलेल्या विद्यापीठ अनुदान १९५६ चा ३.
आयोगाने किंवा औषधशास्त्र अधिनियम, १९४८ अन्वये घटित केलेल्या भारतीय औषधनिर्माणशास्त्र परिषदेने, १९४८ चा ८.
किंवा अधिवक्ता अधिनियम, १९६१ अन्वये घटित केलेल्या भारतीय वकील परिषदेने किंवा, यथास्थिति, १९६१ चा २५.
इतर कोणत्याही सांविधिक मंडळाने निर्धारित केलेल्या दर्जापेक्षा कमी दर्जाच्या नसतील याची सुनिश्चिती करणे.

(२) शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विद्यापीठाची विशेष उद्दिष्टे अधिसूचित करील

(३) पोट-कलम (२) अन्वये काढलेली अधिसूचना, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर ठेवण्यात येईल.

**१०.** विद्यापीठाचे अधिकार व कार्ये पुढीलप्रमाणे असतील :— विद्यापीठाचे अधिकार व कार्ये.

(एक) ऑनलाइन शिक्षण पद्धतीसह पारंपरिक तसेच नवोपक्रमशील पद्धतींच्यामार्फत पाठ्यक्रमांशी संबंधित असणारे अध्ययन, अध्यापन व संशोधन यांच्याबाबतीत तरतुदी करणे व सर्व उपाययोजना (अभ्यासक्रमाचा स्वीकार करणे व अद्ययावतीकरण करणे यांसह) स्वीकृत करणे ;

(दोन) पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे, पुरस्कार, श्रेण्या, श्रेयांक व विद्याविषयक विशेषोपाध्या सुरू करणे व प्रदान करणे ;

(तीन) परीक्षा आयोजित करणे व घेणे ;

(चार) इतर मान्यताप्राप्त विद्यापीठे, मंडळे किंवा परिषदा यांच्या पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे यांच्याशी समतुल्य किंवा सुसंगत पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे यांसाठी तरतूद करणे ;

(पाच) विद्यापीठ परिसर उभारण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना हाती घेणे ;

(सहा) मध्यवर्ती ग्रंथालये, विभागीय ग्रंथालये, संग्रहालये व संलग्न बाबी उभारणे ;

(सात) विहित करण्यात येईल त्याप्रमाणे, मानद पदव्या सुरू करणे व प्रदान करणे ;

(आठ) विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे, अधिछात्रवृत्त्या, शिष्यवृत्त्या, छात्रवृत्त्या सुरू करणे व प्रदान करणे ;

(नऊ) समाजातील शैक्षणिकदृष्ट्या मागास स्तरांमध्ये शिक्षणविषयक सुविधांचा प्रसार करण्यासाठी विशेष उपाययोजना हाती घेणे ;

(दहा) क्रीडा व इतर पाठ्येतर कार्यक्रमांना उत्तेजन देणे व चालना देणे ;

(अकरा) तांत्रिक, प्रशासकीय व इतर आवश्यक पदे निर्माण करणे व त्यांवर नियुक्त्या करणे ;

(बारा) परस्पर मान्य होतील अशा अटी व शर्तीवर संशोधन प्रकल्प हाती घेणे ;

(तेरा) सल्ला सेवा पुरविणे ;

(चौदा) या अधिनियमाच्या तरतुदींनुसार विद्यापीठाची उद्दिष्टे पार पाडण्यासाठी परिनियम, आदेश व विनियम तयार करणे ;

(पंधरा) विद्यापीठाचे अध्यापक, विद्यार्थी व कर्मचारी यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी सह-अभ्यासानुवर्ती उपक्रमांना प्रोत्साहन व चालना देणे ;

(सोळा) राज्य शासन, भारत सरकार व विद्यापीठ अनुदान आयोग यांच्या अनुदेशांनुसार देशांतर्गत व देशाबाहेरील इतर विद्यापीठांच्या संबंधात प्रतियोगी तत्त्वावर दुहेरी पदव्या, पदविका किंवा प्रमाणपत्रे देण्याची तरतूद करणे ;

(सतरा) विद्यापीठाच्या शैक्षणिक कार्यक्रमांमधील विविध ज्ञानशाखांमधील एकात्मीकृत पाठ्यक्रमांसाठी तरतुदी करणे ;

(अठरा) राज्य शासनाने, केंद्र सरकारने व विद्यापीठ अनुदान आयोगाने वेळोवेळी दिलेल्या अनुदेशांनुसार, महाविद्यालये, परिसंस्था, विस्तारित विद्यापीठ परिसर केंद्रे, समुद्रपार परिसर व अभ्यास केंद्रे उभारणे ;

(एकोणीस) विद्यापीठाच्या प्रयोजनांसाठी आणि उद्दिष्टांसाठी देणग्या, दान व अनुदाने स्वीकारणे आणि राज्यामध्ये किंवा राज्याबाहेर, न्यास किंवा दानोपजीवी मालमत्ता यांसह कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता संपादित करणे, धारण करणे, तिची व्यवस्था पाहणे आणि विल्हेवाट लावणे आणि निधींची गुंतवणूक करणे ;

(वीस) या अधिनियमाच्या तरतुदींनुसार विविध पाठ्यक्रमांसाठी वेळोवेळी शुल्क संरचना विहित करणे ;

(एकवीस) वेळोवेळी विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा शुल्काची व इतर आकारांची मागणी करणे व त्यांच्या रकमा स्वीकारणे ;

(बावीस) परस्पर मान्य होतील अशा अटी व शर्तीवर इतर परिसंस्थांचा सहयोग मागणे ;

(तेवीस) विद्यापीठ अनुदान आयोगाने व इतर नियामक मंडळांनी विनिर्दिष्ट केलेल्या मानकांनुसार विद्यापीठाच्या अध्यापकांचे व कर्मचाऱ्यांचे वेतन, पारिश्रमिक, मानधन निश्चित करणे ;

(चोवीस) शालाबाह्य अध्यापन व विस्तारित सेवा आयोजित करणे व हाती घेणे ;

(पंचवीस) सभागृहे व वसतिगृहे स्थापन करणे व त्यांचे परिरक्षण करणे ;

(सव्वीस) विद्यार्थ्यांच्या निवासासाठी विद्यापीठांकडून चालवल्या न जाणाऱ्या सभागृहांना व वसतिगृहांना मान्यता देणे, त्यांचे पर्यवेक्षण व नियंत्रण करणे आणि अशी कोणतीही मान्यता काढून घेणे ;

(सत्तावीस) विद्यापीठाचे विद्यार्थी व कर्मचारी यांच्यामध्ये शिस्तीचे विनियमन करणे व अंमलात आणणे आणि आवश्यक वाटतील अशा शिस्तविषयक उपाययोजना हाती घेणे ;

(अठ्ठावीस) विद्यापीठाचे विद्यार्थी व कर्मचारी यांच्या आरोग्यास व सर्वसाधारण कल्याणास चालना देण्याची व्यवस्था करणे ;

(एकोणतीस) वेळोवेळी विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा अटी व शर्तीवर मान्य करण्यात येतील अशा प्रयोजनांसाठी, विद्यापीठाच्या प्रयोजनांशी व उद्दिष्टांशी अनुरूप असलेल्या प्रयोजनांना, उद्दिष्टांना चालना देण्याच्या दृष्टीने देशातील व देशाबाहेरील इतर कोणत्याही विद्यापीठाशी, प्राधिकरणाशी किंवा कोणत्याही सार्वजनिक किंवा खाजगी मंडळाशी सहकार्य करणे ;

(तीस) विद्यापीठाकडून प्रसिद्ध करण्यात येतील अशा पाठ्यपुस्तकांसह संशोधन व इतर कार्य यांचे मुद्रण, पुनर्मुद्रण व प्रकाशन करण्याची तरतूद करणे ;

(एकतीस) विद्यापीठ अनुदान आयोग (खाजगी विद्यापीठांची स्थापना करणे व दर्जा राखणे) विनियम, २००३ याच्या तरतुदींचे किंवा विद्यापीठ अनुदान आयोगाने केलेले इतर कोणतेही विनियम किंवा दिलेले निदेश यांचे वेळोवेळी अनुपालन व अनुसरण करणे ;

(बत्तीस) विद्यापीठाचे वरील अधिकार, कर्तव्ये व जबाबदाऱ्या यांच्या संदर्भात राज्य शासनाकडून वेळोवेळी देण्यात आलेल्या निदेशांचे अनुपालन करणे व ते अंमलात आणणे ;

(तेहतीस) विद्यापीठाची सर्व किंवा त्यापैकी कोणतीही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आवश्यक, आनुषंगिक किंवा हितावह असतील अशा सर्व गोष्टी करणे.

विद्यापीठ सर्वांसाठी खुले असणे.

**११.** (१) भारताच्या कोणत्याही नागरिकास, लिंग, वंश, पंथ, वर्ग, जात, जन्मस्थान, धर्मश्रद्धा किंवा व्यवसाय किंवा राजकीय किंवा इतर मत केवळ या कारणावरून, विद्यापीठाच्या कोणत्याही पदापासून किंवा त्याच्या कोणत्याही प्राधिकरणांच्या, मंडळांच्या किंवा समित्यांच्या सदस्यत्वापासून किंवा कोणत्याही पदावरील नेमणुकीपासून किंवा कोणतीही पदवी, पदविका, प्रमाणपत्र किंवा इतर विद्याविषयक विशेषोपाधी अथवा अभ्यास पाठ्यक्रम यासाठी प्रवेश मिळवण्यापासून वगळण्यात येणार नाही.

(२) विद्यापीठाचे विभाग परिसंस्था यांमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याच्या प्रयोजनांसाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, विशेष मागास प्रवर्ग आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (ईडब्ल्यूएस) यांच्या आरक्षणाच्या संबंधात वेळोवेळी काढलेल्या शासनाच्या धोरणाचा व आदेशांचा विद्यापीठ अंगीकार करील.

(३) विद्यापीठ, राज्य शासनाने वेळोवेळी दिलेल्या निदेशानुसार समाजातील दुर्बल घटकांच्या विविध प्रवर्गांच्या व अल्पसंख्याक वर्गाच्या कल्याणासंबंधात, राज्य शासनाच्या सर्वसाधारण धोरणाचा अंगीकार करील.

**१२.** या अधिनियमान्वये स्थापन केलेले प्रत्येक विद्यापीठ हे, स्वयं-अर्थसहाय्यित असेल. विद्यापीठ, शासनाकडून कोणत्याही स्वरूपाचे इतर वित्तीय सहाय्य मिळण्यास हक्कदार असणार नाही आणि विद्यापीठात प्रवेश घेतलेला कोणताही विद्यार्थी, कोणत्याही प्रकारच्या वित्तीय सहाय्यासाठी किंवा शिष्यवृत्तीसाठी किंवा शुल्काच्या प्रतिपूर्तीसाठी राज्य शासनाकडे मागणी करण्यास हक्कदार असणार नाही. विद्यापीठ स्वयं-अर्थसहाय्यित असणे.

**१३.** (१) प्रायोजक मंडळ, शासनाने काढलेल्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रकमेचा विद्यापीठाचा दाननिधी स्थापन करील. दाननिधी.

(२) विद्यापीठ, या अधिनियमाच्या तरतुदींचे आणि त्याखाली केलेले नियम, परिनियम किंवा आदेश यांचे पालन करीत असल्याची सुनिश्चिती करण्यासाठी प्रतिभूती ठेव म्हणून दाननिधीचा वापर करण्यात येईल.

(३) विद्यापीठाने किंवा प्रायोजक मंडळाने या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींचे आणि त्याखाली केलेले नियम, परिनियम, आदेश किंवा विनियम यांचे उल्लंघन केल्यास, शासनास, संपूर्ण दाननिधी किंवा त्याचा काही भाग, विहित रीतीने सरकारजमा करण्याचा अधिकार असेल.

(४) दाननिधीमधून मिळणाऱ्या उत्पन्नाचा वापर, विद्यापीठाच्या पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी करण्यात येईल, परंतु विद्यापीठाचा आवर्ती खर्च भागविण्यासाठी त्याचा वापर करण्यात येणार नाही.

(५) विद्यापीठाचे विसर्जन होईपर्यंत, दाननिधीची रक्कम अशा प्रकारे निधीतून गुंतविलेल्या रकमा, शासनाच्या परवानगीशिवाय काढण्यात येणार नाही या शर्तीस अधीन राहून, संयुक्त धारक म्हणून उच्च शिक्षण संचालकाकडून राष्ट्रीयीकृत बँकेत नियत ठेवीच्या स्वरुपात, विद्यापिठाकडून गुंतवण्यात येईल.

**१४.** विद्यापीठ, सर्वसाधारण निधी म्हणून संबोधण्यात येणारा एक निधीदेखील घटित करील, ज्यामध्ये पुढील रकमा जमा करण्यात येतील :— सर्वसाधारण निधी.

(क) विद्यापीठाला मिळालेले शुल्क व इतर आकार ;

(ख) प्रायोजक मंडळाने दिलेले कोणतेही अंशदान ;

(ग) संयंत्रणा व विद्यापीठाने हाती घेतलेली इतर कामे यांमधून मिळालेले कोणतेही उत्पन्न ;

(घ) मृत्युपत्रित दान, देणग्या, दाननिधी आणि इतर कोणतीही अनुदाने ; आणि

(ङ) विद्यापीठाला मिळालेल्या इतर सर्व रकमा.

**१५.** विद्यापीठाच्या कारभाराच्या संबंधातील सर्व आवर्ती किंवा अनावर्ती खर्च भागविण्यासाठी सर्वसाधारण निधीचा वापर करण्यात येईल : सर्वसाधारण निधीचे उपयोजन.

परंतु, व्यवस्थापकीय मंडळाकडून निश्चित करण्यात येईल अशा, त्या वर्षाच्या एकूण आवर्ती खर्चाच्या आणि एकूण अनावर्ती खर्चाच्या मर्यादेपेक्षा कोणताही अधिक खर्च, व्यवस्थापकीय मंडळाच्या पूर्वमान्यतेशिवाय, विद्यापीठाकडून करण्यात येणार नाही.

**१६.** विद्यापीठाचे अधिकारी पुढीलप्रमाणे असतील :— विद्यापीठाचे अधिकारी.

(क) अध्यक्ष, जो विद्यापीठाचा कुलपती देखील असेल ;

(ख) कुलगुरू ;

(ग) विद्याशाखांचे अधिष्ठाते ;

(घ) कुलसचिव ;

(ङ) मुख्य वित्त व लेखा अधिकारी ;

(च) परीक्षा नियंत्रक ; आणि

(छ) विद्यापीठाचे अधिकारी म्हणून परिनियमांद्वारे घोषित करण्यात येतील अशा, विद्यापीठाच्या सेवेतील इतर व्यक्ती.

**१७.** (१) प्रायोजक मंडळ, नियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा रीतीने, शासनाच्या मान्यतेने, तीन वर्षांच्या कालावधीसाठी अध्यक्षाची नियुक्ती करील. अध्यक्ष.

(२) अध्यक्ष पदाचे पात्रता व निकष, नियम व विनियम यांद्वारे विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

(३) अध्यक्ष हा, विद्यापीठाचा प्रमुख असेल.

(४) अध्यक्ष, नियामक मंडळाच्या बैठकींचे आणि पदवी, पदविका किंवा इतर विद्याविषयक विशेषोपाध्या प्रदान करण्यासाठी विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभाचे अध्यक्षस्थान भूषवील.

(५) अध्यक्षाला पुढील अधिकार असतील :—

(क) विद्यापीठाच्या कामकाजाच्या संबंधात, विद्यापीठाच्या कोणत्याही अधिकाऱ्याकडून किंवा प्राधिकरणाकडून कोणतीही माहिती किंवा अभिलेख मागविणे ;

(ख) कुलगुरुची नियुक्ती करणे ;

(ग) कलम २० च्या तरतुदींनुसार कुलगुरुला पदावरून दूर करणे ;

(घ) परिनियमांद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येतील असे इतर अधिकार.

अध्यक्षाला पदावरून दूर करणे.

**१८.** जर अध्यक्षपद धारण करणारी व्यक्ती,—

(क) विकल मनाची असेल आणि ती तशी असल्याचे सक्षम न्यायालयाने घोषित केले असेल ; किंवा

(ख) नैतिक अधःपतनाचा अंतर्भाव असलेल्या कोणत्याही अपराधाकरिता एखाद्या न्यायालयाकडून तिला दोषसिद्ध ठरविण्यात आले असेल ; किंवा

(ग) अविमुक्त नादार झालेली असेल आणि सक्षम न्यायालयाकडून ती तशी असल्याचे घोषित केले असेल ; किंवा

(घ) दीर्घ आजारपणामुळे किंवा विकलांगतेमुळे त्या पदाची कार्ये किंवा कर्तव्ये बजावण्यास ती शारीरिकदृष्ट्या अपात्र आणि असमर्थ झाली असेल ; किंवा

(ङ) तिने, या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याचे हेतुपुरस्सर टाळले असेल किंवा त्यास नकार दिला असेल ; किंवा सेवा संविदेच्या कोणत्याही अटी व शर्तींचा किंवा, परिनियमांद्वारे विहित केलेल्या अन्य कोणत्याही शर्तींचा भंग केला असेल, किंवा तिच्याकडे निहित असलेल्या अधिकारांचा दुरुपयोग केला असेल किंवा ती अध्यक्ष म्हणून त्या पदावर असण्याचे चालू ठेवणे विद्यापीठाच्या हिताच्या दृष्टीने हानिकारक झाले असेल,

याबद्दल प्रायोजक मंडळाची खात्री पटली असेल तर, प्रायोजक मंडळ, तिला त्या पदावरून दूर करू शकेल :

परंतु, खंड (घ) किंवा (ङ) अन्वये अध्यक्षाला उक्त पदावरून दूर करण्यापूर्वी प्रायोजक मंडळाकडून, त्याला कारणे दाखविण्याची वाजवी संधी देण्यात येईल.

कुलगुरू.

**१९.** (१) याबाबतीत विद्यापीठ अनुदान आयोगाने तयार केलेल्या नियमांनुसार व विनियमांनुसार घटित केलेल्या शोध-नि-निवड समितीने शिफारस केलेल्या, तीन व्यक्तींच्या नामिकेमधून, परिनियमांद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा पात्रता निकषांची पूर्तता करणाऱ्या आणि अशा अटी व शर्तींवर, अध्यक्षाद्वारे कुलगुरूची नियुक्ती करण्यात येईल. कुलगुरू, कलम २० मध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदींना अधीन राहून, तीन वर्षांच्या मुदतीसाठी पद धारण करील :

परंतु, तीन वर्षांची मुदत समाप्त झाल्यानंतर, कुलगुरु, आणखी तीन वर्षांच्या मुद्तीकरिता पुर्निनयुक्तीसाठी पात्र असेल :

परंतु आणखी असे की, कुलगुरू, उक्त मुदत समाप्त झाल्यानंतरदेखील, नवीन कुलगुरू त्याच्या पदावर रूजू होईपर्यंत, त्याचे पद धारण करणे सुरू ठेवील, तथापि, कोणत्याही परिस्थितीत, हा कालावधी एक वर्षापेक्षा अधिक असणार नाही.

(२) कुलगुरू हा, विद्यापीठाचा प्रमुख कार्यकारी व विद्याविषयक अधिकारी असेल आणि त्याला, विद्यापीठाच्या कामकाजाचे अधीक्षण करण्याचे आणि त्यावर नियंत्रण ठेवण्याचे अधिकार असतील आणि तो, विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांच्या निर्णयांची अंमलबजावणी करील.

(३) कुलगुरू, अध्यक्षाच्या अनुपस्थितीत विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभाचे अध्यक्षस्थान भूषवील.

(४) ज्यासाठी या अधिनियमाद्वारे किंवा त्याअन्वये इतर कोणत्याही प्राधिकरणाला अधिकार प्रदान केलेले आहेत अशा कोणत्याही बाबींवर तात्काळ कारवाई करणे आवश्यक आहे असे कुलगुरुचे मत असेल तर, तो,

त्याला आवश्यक वाटेल अशी कारवाई करू शकेल आणि त्याने केलेल्या कारवाईचा अहवाल, त्यानंतर, लवकरात लवकर, सर्वसाधारण नित्यक्रमात ज्या अधिकाऱ्याने किंवा प्राधिकरणाने, ती बाब हाताळली असती अशा अधिकाऱ्याला किंवा प्राधिकरणाला देईल :

परंतु, अशी कारवाई कुलगुरूने करावयास नको होती, असे संबंधित अधिकाऱ्याचे किंवा प्राधिकरणाचे मत असेल तर, असे प्रकरण निर्णयार्थ अध्यक्षाकडे पाठवण्यात येईल आणि त्यावरील त्याचा निर्णय अंतिम असेल.

(५) कुलगुरूच्या मते, विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाचा कोणताही निर्णय, हा अधिनियम किंवा त्याखाली केलेले परिनियम, आदेश, विनियम किंवा नियम यांद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांच्या कक्षेबाहेरील असेल किंवा त्यामुळे विद्यापीठाच्या हितांस बाधा पोहोचण्याची शक्यता असेल तर, तो, निर्णयाच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत त्याचा निर्णय बदलण्याची संबंधित प्राधिकरणाला विनंती करील आणि जर प्राधिकरणाने अशा निर्णयात पूर्णपणे किंवा अंशतः सुधारणा करण्यास नकार दिला, किंवा पंधरा दिवसांच्या आत कोणताही निर्णय घेण्यास निष्फळ ठरले तर, अशी बाब, निर्णयार्थ अध्यक्षाकडे पाठवण्यात येईल आणि त्यावरील त्याचा निर्णय अंतिम असेल.

(६) कुलगुरू, परिनियमांद्वारे किंवा आदेशांद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा अधिकारांचा वापर करील आणि अशी कर्तव्ये पार पाडील.

**२०.** जर कुलगुरू पद धारण करणारी व्यक्ती,— कुलगुरुला पदावरून दूर करणे.

(क) विकल मनाची असेल आणि ती तशी असल्याचे सक्षम न्यायालयाने घोषित केले असेल ; किंवा

(ख) नैतिक अधःपतनाचा अंतर्भाव असलेल्या कोणत्याही अपराधाकरिता एखाद्या न्यायालयाकडून तिला दोषसिद्ध ठरविण्यात आले असेल ; किंवा

(ग) अविमुक्त नादार झालेली असेल आणि सक्षम न्यायालयाकडून ती तशी असल्याचे घोषित केले असेल ; किंवा

(घ) दीर्घ आजारपणामुळे किंवा विकलांगतेमुळे त्या पदाची कार्य किंवा कर्तव्ये बजावण्यास ती शारीरिकदृष्ट्या अपात्र आणि असमर्थ झाली असेल ; किंवा

(ङ) तिने, या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याचे हेतुपुरस्सर टाळले असेल किंवा त्यास नकार दिला असेल किंवा सेवा संविदेच्या कोणत्याही अटी व शर्तींचा किंवा परिनियमांद्वारे निर्धारित केलेल्या अन्य कोणत्याही शर्तींचा भंग केला असेल, किंवा तिच्याकडे निहित असलेल्या अधिकारांचा दुरुपयोग केला असेल किंवा ती कुलगरू म्हणून त्या पदावर असण्याचे चालू ठेवणे विद्यापीठाच्या हिताच्या दृष्टीने हानिकारक झाले असेल,

याबद्दल अध्यक्षाची खात्री पटली असेल तर, तो, तिला त्या पदावरून दूर करु शकेल :

परंतु, खंड (घ) किंवा (ङ) अन्वये कुलगुरुला त्याच्या पदावरून दूर करण्यापूर्वी, अध्यक्षाकडून, त्याला कारणे दाखविण्याची वाजवी संधी देण्यात येईल.

**२१.** (१) विद्याशाखांच्या अधिष्ठात्यांची नियुक्ती, परिनियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा रीतीने व सेवेच्या अशा अटीं व शर्तींवर अध्यक्षाकडून करण्यात येईल. विद्याशाखांचे अधिष्ठाते.

(२) विद्याशाखांचे अधिष्ठाते हे, विद्यापीठाचे विद्याविषयक व इतर कामकाजाचे व्यवस्थापन करण्यामध्ये कुलगुरुला सहाय्य करतील आणि ते, विनियमांद्वारे विहित करण्यात येतील किंवा अध्यक्ष व कुलगुरु यांच्याकडून सोपविण्यात येतील, अशा अधिकारांचा वापर करतील आणि अशी कार्ये पार पाडतील.

कुलसचिव. **२२.** (१) कुलसचिवाची नियुक्ती, परिनियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा रीतीने आणि सेवेच्या अशा अटीं व शर्तीवर अध्यक्षाकडून करण्यात येईल.

(२) कुलसचिव, विद्यापीठाचा मुख्य प्रशासकीय अधिकारी असेल. विद्यापीठाच्या प्राधिकरणांच्या निर्णयास अधीन राहून, त्यास विद्यापीठाच्या वतीने करारनामा करण्याचा, करार करण्याचा, दस्तऐवजांवर स्वाक्षरी करण्याचा व अभिलेख अधिप्रमाणित करण्याचा अधिकार असेल. तो, परिनियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा अधिकारांचा वापर करील आणि अशी कर्तव्ये पार पाडील.

(३) कुलसचिव, नियामक मंडळ, व्यवस्थापन मंडळ व विद्यापरिषद यांचा सदस्य-सचिव असेल, परंतु, त्यास मत देण्याचा हक्क असणार नाही.

(४) कुलसचिव, विद्यापीठाचे अभिलेख, सामाईक मोहोर यांचा आणि नियामक मंडळ त्याच्याकडे सुपूर्द करील अशा इतर मालमत्तेचा अभिरक्षक असेल.

(५) कुलसचिव, या कुलगुरुकडून त्यास वेळोवेळी, सोपविण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करील आणि अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

परीक्षा नियंत्रक. **२३.** (१) परीक्षा नियंत्रकाची नियुक्ती, परिनियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा रीतीने आणि सेवेच्या अशा अटी व शर्तीवर अध्यक्षाकडून करण्यात येईल.

(२) परीक्षा नियंत्रक, विद्यापीठाच्या परीक्षा व चाचण्या घेण्याचा आणि त्यांचे निकाल घोषित करण्याचा प्रमुख प्रभारी अधिकारी असेल. तो, कुलगुरुच्या अधीक्षणाखाली, निदेशनाखाली व मार्गदर्शनाखाली त्याची कार्ये पार पाडील.

(३) परीक्षा नियंत्रक, विद्यापीठाचा पूर्ण वेळ वेतनी अधिकारी असेल आणि तो, विद्यापीठाच्या कुलगुरुच्या थेट निदेशनाखाली व नियंत्रणाखाली काम करील. त्याची नियुक्ती, तीन वर्षांच्या मुदतीसाठी असेल आणि तो, तीन वर्षांपेक्षा अधिक नसेल इतक्या मुदतीसाठी पुनर्नियुक्तीस पात्र असेल. परीक्षा नियंत्रकाच्या निवडीच्या प्रयोजनासाठी अर्हता व अनुभव, परिनियमांद्वारे विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

(४) परीक्षा नियंत्रक, पुढील गोष्टींसाठी जबाबदार असेल,—

(क) परीक्षांची नियमिका तयार करणे व ती आधीच घोषित करणे ;

(ख) प्रश्नपत्रिकांच्या मुद्रणाची व्यवस्था करणे ;

(ग) परीक्षांचा आणि इतर चाचण्यांचा निकाल वेळेवर प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करणे ;

(घ) परीक्षांशी संबंधित असलेले आणि परीक्षांच्या संबंधातील गैरप्रकारांबद्दल दोषी असल्याचे आढळून आलेले उमेदवार, प्राश्निक, परीक्षक, नियामक, किंवा इतर कोणत्याही व्यक्ती यांच्याविरुद्ध, आवश्यक असेल तेव्हा शिस्तभंगाची कारवाई करणे ;

(ङ) विद्यापीठ परीक्षांच्या निकालांचा वेळोवेळी आढावा घेणे आणि त्यावरील अहवाल विद्यापरिषदेला पाठवणे ;

(च) परीक्षा नियंत्रक हा, परिनियमांद्वारे विहित करण्यात येतील अशा किंवा त्याच्याकडे सोपवण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करील आणि अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

**२४.** (१) मुख्य वित्त व लेखा अधिकारी, विद्यापीठाचा प्रमुख वित्त, लेखा व लेखापरीक्षा अधिकारी असेल. मुख्य वित्त व लेखा अधिकारी.

(२) मुख्य वित्त व लेखा अधिकाऱ्याची नियुक्ती, परिनियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा रीतीने आणि सेवेच्या अशा अटी व शर्तींवर अध्यक्षाकडून करण्यात येईल.

(३) मुख्य वित्त व लेखा अधिकारी, परिनियमांद्वारे विहित करण्यात येतील अशा अधिकारांचा वापर करील किंवा अशी कर्तव्ये पार पाडील.

**२५.** (१) विद्यापीठास, त्याची कार्ये पार पाडण्यासाठी आवश्यक असतील अशा इतर अधिकाऱ्यांची नियुक्ती करता येईल. इतर अधिकारी.

(२) विद्यापीठाच्या इतर अधिकाऱ्यांच्या नियुक्तीची रीत, अशा अधिकाऱ्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती आणि त्यांचे अधिकार व कार्ये ही, परिनियमांद्वारे विहित करण्यात येतील अशी असतील.

**२६.** विद्यापीठाची प्राधिकरणे, पुढीलप्रमाणे असतील :— विद्यापीठाची प्राधिकरणे.

(क) नियामक मंडळ ;

(ख) व्यवस्थापन मंडळ ;

(ग) विद्यापरिषद ;

(घ) परीक्षा मंडळ ; आणि

(ङ) विद्यापीठाची प्राधिकरणे म्हणून परिनियमांद्वारे विहित करण्यात येतील अशी विद्यापीठाची इतर प्राधिकरणे.

**२७.** (१) विद्यापीठाच्या नियामक मंडळात, पुढील सदस्यांचा अंतर्भाव असेल :— नियामक मंडळ.

(क) अध्यक्ष ;

(ख) कुलगरू ;

(ग) प्रायोजक मंडळाकडून नामनिर्देशित केलेल्या पाच व्यक्ती, त्यांपैकी दोन ख्यातनाम शिक्षणतज्ज्ञ असतील ;

(घ) अध्यक्षाने नामनिर्देशित केलेला, विद्यापीठाच्या बाहेरील व्यवस्थापन किंवा माहिती तंत्रज्ञान या क्षेत्रामधील एक तज्ज्ञ ;

(ङ) राज्य शासनाने नामनिर्देशित केलेल्या दोन व्यक्ती ;

(च) अध्यक्षाने नामनिर्देशित करावयाचे, उद्योग क्षेत्राचे दोन प्रतिनिधी ; आणि

(छ) विद्यापीठाचा कुलसचिव, नियामक मंडळाचा कायमस्वरूपी निमंत्रित असेल, परंतु, त्याला मत देण्याचा हक्क असणार नाही.

(२) नियामक मंडळ हे, विद्यापीठाचे सर्वोच्च प्राधिकरण असेल.

(३) नियामक मंडळास पुढील अधिकार असतील :—

(क) हा अधिनियम आणि त्याखाली केलेले परिनियम, आदेश, विनियम किंवा नियम यांद्वारे तरतूद करण्यात आलेल्या असतील अशा सर्व अधिकारांचा वापर करून, विद्यापीठाचे सर्वसाधारण अधीक्षण व निदेशन करणे आणि विद्यापीठाच्या कामकाजाचे नियंत्रण करणे ;

(ख) विद्यापीठाच्या इतर प्राधिकरणांचे निर्णय, या अधिनियमाच्या तरतुदींशी आणि त्याखाली केलेल्या

नियमांशी, परिनियमांशी, आदेशांशी किंवा विनियमांशी, अनुरूप नसतील तर, त्या निर्णयांचे पुनर्विलोकन करणे ;

(ग) विद्यापीठाच्या अर्थसंकल्पास व वार्षिक अहवालास मान्यता देणे ;

(घ) विद्यापीठाने अनुसरावयाची धोरणे निर्धारित करणे ;

(ङ) सर्व प्रयत्न करून देखील विद्यापीठाचे कामकाज सुरळीतपणे चालविणे शक्य नाही अशी परिस्थिती उद्भवली असेल तर, विद्यापीठाचे स्वेच्छेने परिसमापन करण्याबद्दल प्रायोजक मंडळास शिफारस करणे ; आणि

(च) परिनियमांद्वारे विहित करण्यात येतील असे इतर अधिकार.

(४) नियामक मंडळ, एका कॅलेंडर वर्षात किमान तीन वेळा बैठकी घेईल.

(५) नियामक मंडळाच्या बैठकांची गणपूर्ती, पाच इतकी असेल.

व्यवस्थापन मंडळ.

**२८.** (१) व्यवस्थापन मंडळात, पुढील सदस्यांचा अंतर्भाव असेल :—

(क) कुलगुरू ;

(ख) प्रायोजक मंडळाने नामनिर्देशित केलेले, नियामक मंडळाचे दोन सदस्य ;

(ग) कुलगुरुने, आळीपाळीने नामनिर्देशित करावयाचे, विद्याशाखांचे दोन अधिष्ठाते ;

(घ) प्रायोजक मंडळाने नामनिर्देशित केलेल्या, नियामक मंडळाच्या सदस्य नसलेल्या तीन व्यक्ती ; आणि

(ङ) प्रायोजक मंडळाने, अध्यापकांमधून नामनिर्देशित केलेल्या तीन व्यक्ती.

(२) कुलगुरू, व्यवस्थापन मंडळाचा अध्यक्ष असेल.

(३) व्यवस्थापन मंडळाचे अधिकार व कार्ये, परिनियमांद्वारे विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

(४) व्यवस्थापन मंडळ, दर दोन महिन्यांतून किमान एकदा बैठक बोलावील.

(५) व्यवस्थापन मंडळाच्या बैठकींची गणपूर्ती, पाच इतकी असेल.

विद्यापरिषद.

**२९.** (१) विद्यापरिषदेमध्ये, कुलगुरु आणि परिनियमांद्वारे विहित करण्यात येतील असे इतर सदस्य यांचा अंतर्भाव असेल.

(२) कुलगुरू हा, विद्यापरिषदेचा पदसिद्ध अध्यक्ष असेल.

(३) विद्यापरिषद ही, विद्यापीठाचे प्रमुख विद्याविषयक मंडळ असेल आणि या अधिनियमाच्या तरतुदींना आणि त्याखाली केलेल्या नियमांना, परिनियमांना किंवा आदेशांना अधीन राहून, विद्यापीठाचे समन्वयन करील आणि विद्यापीठाच्या विद्याविषयक धोरणाचे सर्वसाधारण पर्यवेक्षण करील.

(४) विद्यापरिषदेच्या बैठकीची गणपूर्ती, परिनियमांद्वारे विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

परीक्षा मंडळ.

**३०.** (१) परीक्षा मंडळ हे, परीक्षा घेण्यासाठी आणि परीक्षांचे संचालन करणे व परीक्षा आयोजित करणे, परीक्षा पद्धतीत सुधारणा करणे, प्राश्निक, परीक्षक व नियामक यांची नियुक्ती करणे आणि तसेच परीक्षा घेण्यासाठी परीक्षांचे वेळापत्रक तयार करणे व निकाल घोषित करणे यांसंबंधातील धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी विद्यापीठाचे प्रमुख प्राधिकरण असेल. परीक्षा मंडळ हे, अभ्यास केंद्रांतील किंवा विद्यापीठाशी संबंधित असलेल्या कोणत्याही केंद्रातील परीक्षांच्या आयोजनाचे पर्यवेक्षण व विनियमन देखील करील.

**स्पष्टीकरण.—** या कलमाच्या आणि कलम ४४ च्या प्रयोजनार्थ, " परीक्षांचे वेळापत्रक " या शब्दप्रयोगाचा अर्थ, परीक्षांच्या योजनेचा एक भाग असलेली प्रत्येक प्रश्नपत्रिका सुरू होण्याची वेळ, दिवस व दिनांक यांविषयीचा तपशील देणारा तक्ता असा आहे आणि त्यामध्ये, प्रात्यक्षिक परीक्षांबद्दलच्या तपशिलांचा देखील समावेश आहे.

(२) परीक्षा मंडळात, पुढील सदस्यांचा अंतर्भाव असेल :—

(क) कुलगुरू–अध्यक्ष ;

(ख) प्रत्येक विषयाचा प्राध्यापक–सदस्य ;

(ग) एक मूल्यमापन तज्ज्ञ–स्वीकृत सदस्य ;

(घ) परीक्षा नियंत्रक–सदस्य-सचिव.

(३) परीक्षा मंडळाचे अधिकार व कार्ये, परिनियमांद्वारे विहित करण्यात येतील अशी असतील.

**३१.** विद्यापीठाच्या इतर प्राधिकरणांची रचना, अधिकार व कार्ये, परिनियमांद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येतील अशी असतील. इतर प्राधिकरणे.

**३२.** जर एखादी व्यक्ती,— अपात्रता.

(क) विकल मनाची असेल आणि एखाद्या सक्षम न्यायालयाने तिला तसे घोषित केले असेल ; किंवा

(ख) नैतिक अध:पतनाचा अंतर्भाव असलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल तिला दोषसिद्ध ठरविलेले असेल ; किंवा

(ग) ती स्वतः खाजगी शिकवणी वर्ग घेत असेल किंवा खाजगी शिकवणी वर्ग चालवत असेल ; किंवा

(घ) कोणत्याही परीक्षा घेताना, कोणत्याही प्रकारे, कोठेही, अनुचित व्यवहार केल्याबद्दल किंवा त्यास चालना दिल्याबद्दल तिला शिक्षा झालेली असेल,

तर, अशा कोणत्याही व्यक्तीस, विद्यापीठाच्या प्राधिकरणांपैकी किंवा मंडळांपैकी कोणत्याही प्राधिकरणाचा किंवा मंडळाचा सदस्य होण्यास अपात्र ठरविण्यात येईल.

**३३.** विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाची किंवा मंडळाची कोणतीही कृती किंवा कार्यवाही ही, केवळ त्यात कोणतेही पद रिक्त असल्याच्या किंवा त्याच्या रचनेत दोष असल्याच्या कारणावरून विधिअग्राह्य ठरणार नाही. रिक्त पदांमुळे विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाची किंवा मंडळाची कार्यवाही विधिअग्राह्य न ठरणे.

**३४.** एखाद्या सदस्याचा मृत्यू, राजीनामा किंवा त्याला काढून टाकणे यांमुळे विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणातील किंवा मंडळातील कोणतेही नैमित्तिक पद रिक्त झाले असेल त्याबाबतीत, ते पद, ज्या सदस्याचे पद रिक्त झाले असेल त्या सदस्याच्या जागी एखाद्या व्यक्तीची नियुक्ती करून किंवा तिला नामनिर्देशित करून, शक्य तितक्या लवकर भरण्यात येईल ; आणि नैमित्तिक रिक्त पद भरण्यासाठी अशा प्रकारे नियुक्त केलेली किंवा नामनिर्देशित केलेली व्यक्ती ही, ज्या सदस्याच्या जागी तिला अशा प्रकारे नियुक्त किंवा नामनिर्देशित केले असेल अशा सदस्याच्या उर्वरित मुदतीकरिता, अशा प्राधिकरणाची किंवा मंडळाची सदस्य असेल. नैमित्तिक रिक्त पदे भरणे.

**३५.** (१) विद्यापीठाच्या प्राधिकरणांना किंवा अधिकाऱ्यांना, समित्यांकडून पार पाडल्या जाणाऱ्या विनिर्दिष्ट कामांसाठी आवश्यक असतील अशा विचारार्थ विषयांनुसार अशा समित्या घटित करता येतील. समित्या.

(२) अशा समित्यांची रचना, परिनियमांद्वारे विहित करण्यात येईल अशी असेल.

**३६.** (१) विद्यापीठाचे पहिले परिनियम, नियामक मंडळाकडून तयार करण्यात येतील आणि शासनाच्या मान्यतेसाठी ते, शासनाकडे सादर करण्यात येतील. पहिले परिनियम.

(२) या अधिनियमाच्या, आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींस अधीन राहून, विद्यापीठाच्या पहिल्या परिनियमांमध्ये, पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल :—

(क) वेळोवेळी घटित करण्यात येतील अशी, विद्यापीठाची प्राधिकरणे व इतर मंडळे यांची रचना, अधिकार व कर्तव्ये ;

(ख) कुलगुरूच्या नियुक्तीच्या अटी व शर्ती आणि त्याचे अधिकार व कार्ये ;

(ग) विद्याशाखांचे अधिष्ठाते, कुलसचिव आणि मुख्य वित्त व लेखा अधिकारी यांच्या नियुक्तीची रीत आणि सेवेच्या अटी व शर्ती आणि त्यांचे अधिकार व कार्ये ;

(घ) कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीची रीत आणि त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती आणि त्यांचे अधिकार व कार्ये ;

(ङ) कर्मचारी, विद्यार्थी व विद्यापीठ यांच्यामधील विवादांच्या बाबतीत, लवादाची कार्यपद्धती ;

(च) मानद पदव्या प्रदान करणे ;

(छ) शिक्षण शुल्क देण्यापासून विद्यार्थ्यांना सूट देण्यासंबंधीच्या आणि त्यांना शिष्यवृत्या व छात्रवृत्त्या प्रदान करण्यासंबंधीच्या तरतुदी ;

(ज) राखीव जागांचे विनियमन करण्यासह विविध पाठ्यक्रमांमधील प्रवेश व जागांची संख्या यांच्या धोरणासंबंधातील तरतुदी ; आणि

(झ) विद्यार्थ्यांकडून आकारण्यात येणाऱ्या शुल्कांसंबंधातील तरतुदी.

(३) शासन, विद्यापीठाने सादर केलेले पहिले परिनियम विचारात घेईल आणि ते मिळाल्याच्या दिनांकापासून चार महिन्यांच्या आत, त्याला आवश्यक वाटतील अशा फेरबदलांसह, कोणतेही असल्यास, त्यावर आपली मान्यता देईल.

नंतरचे परिनियम. **३७.** (१) या अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींस अधीन राहून, विद्यापीठाच्या नंतरच्या परिनियमांमध्ये, पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल :—

(क) विद्यापीठाच्या नवीन प्राधिकरणांची निर्मिती करणे ;

(ख) लेखांकन धोरण व वित्तीय कार्यपद्धती ;

(ग) विद्यापीठाच्या प्राधिकरणांमधील अध्यापकांचे प्रतिनिधित्व ;

(घ) नवीन विभागांची निर्मिती आणि विद्यमान विभाग बंद करणे किंवा त्यांची पुनर्रचना करणे ;

(ङ) पदके व पारितोषिके सुरू करणे ;

(च) पदनिर्मिती व पदे रद्द करण्याची कार्यपद्धती ;

(छ) फीमध्ये सुधारणा करणे ;

(ज) वेगवेगळ्या अभ्यासक्रमांमधील जागांच्या संख्येत फेरबदल करणे ; आणि

(झ) या अधिनियमाच्या तरतुदींन्वये ज्या बाबी परिनियमांद्वारे विनिर्दिष्ट करावयाच्या आहेत अशा इतर सर्व बाबी.

(२) पहिल्या परिनियमांव्यतिरिक्त, विद्यापीठाचे परिनियम हे, नियामक मंडळाच्या मान्यतेने व्यवस्थापन मंडळाकडून करण्यात येतील.

(३) व्यवस्थापन मंडळास, वेळोवेळी, नवीन किंवा अतिरिक्त परिनियम करता येतील किंवा अशा प्रकारे केलेल्या परिनियमांमध्ये, या कलमामध्ये यात यापुढे तरतूद केलेल्या रीतीने सुधारणा करता येईल किंवा त्यांचे निरसन करता येईल :

परंतु, व्यवस्थापन मंडळ हे, विद्यापीठाच्या कोणत्याही विद्यमान प्राधिकरणाला प्रस्तावावर मत मांडण्याची संधी देण्यात येईपर्यंत, अशा प्राधिकरणाचा दर्जा, अधिकार किंवा रचना यांना बाधक ठरणारा कोणताही परिनियम करणार नाही किंवा परिनियमांमध्ये कोणतीही सुधारणा करणार नाही, आणि अशा प्रकारे मांडलेले कोणतेही मत लेखी असेल व ते नियामक मंडळाकडून विचारात घेण्यात येईल.

(४) असे प्रत्येक परिनियम किंवा त्या परिनियमांमध्ये भर घालणे किंवा परिनियमांमध्ये कोणतीही सुधारणा करणे किंवा त्यांचे निरसन करणे या बाबी, शासनाच्या मान्यतेच्या अधीन असतील :

परंतु, विद्यार्थ्यांची शिस्त आणि अध्यापन, शिक्षण व परीक्षा यांचा दर्जा यांना बाधक ठरणारा कोणताही परिनियम, विद्यापरिषदेशी विचारविनिमय केल्याखेरीज, व्यवस्थापन मंडळाकडून करण्यात येणार नाही.

**३८.** (१) विद्यापीठाचे पहिले आदेश, नियामक मंडळाकडून काढण्यात येतील आणि ते, शासनाच्या मान्यतेसाठी शासनाला सादर करण्यात येतील. पहिले आदेश.

(२) या अधिनियमाच्या तरतुदींना आणि त्याखाली केलेल्या नियमांस किंवा परिनियमांस अधीन राहून, व्यवस्थापन मंडळास, विद्यापीठाच्या उद्दिष्टांना चालना देण्यासाठी त्याला योग्य वाटेल असे पहिले आदेश, नियामक मंडळाच्या मान्यतेने, काढता येतील आणि त्या आदेशांमध्ये, पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल :—

(क) विद्यापीठामध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश देणे आणि त्याप्रमाणे त्यांची नावनोंदणी करणे ;

(ख) विद्यापीठाच्या पदव्या, पदविका व प्रमाणपत्रे यांसाठी निर्धारित करावयाचे अभ्यास पाठ्यक्रम ;

(ग) पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे आणि इतर विद्याविषयक विशेषोपाध्या प्रदान करणे, त्यांची किमान अर्हता आणि त्या देण्याच्या व मिळण्याच्या संबंधात करावयाच्या उपाययोजना ;

(घ) छात्रवृत्त्या, शिष्यवृत्ता, विद्यावेतने, पदके व पारितोषिके प्रदान करण्याच्या शर्ती;

(ङ) परीक्षा मंडळे, परीक्षक व नियामक यांचा पदावधी व त्यांच्या नियुक्तीची रीत आणि कर्तव्ये यांसह परीक्षा घेणे;

(च) विद्यापीठाचे विविध पाठ्यक्रम, परीक्षा, पदव्या व पदविका यांच्यासाठी आकरावयाचे शुल्क;

(छ) विद्यापीठाच्या वसतिगृहांमधील विद्यार्थ्यांच्या निवासाच्या शर्ती;

(ज) विद्यार्थ्यांविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्यासंबंधातील तरतुदी;

(झ) विद्यापीठाच्या शैक्षणिक वातावरणात सुधारणा करण्यासाठी ज्याची आवश्यकता वाटली असेल अशा इतर कोणत्याही मंडळाची निर्मिती, रचना व कार्ये;

(ञ) उच्च शिक्षणाच्या बाबतीत इतर विद्यापीठांशी आणि परिसंस्थांशी सहकार्य करण्याची व सहयोग करण्याची रीत ; आणि

(ट) या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या परिनियमांच्या तरतुदींन्वये ज्या बाबींची आदेशांमध्ये तरतूद करण्याची आवश्यकता आहे अशा इतर सर्व बाबी.

(३) शासन, पोट-कलम (१) अन्वये कुलगुरुने सादर केलेल्या पहिल्या आदेशांवर विचार करील आणि ते मिळाल्याच्या दिनांकापासून चार महिन्यांच्या आत, त्याला आवश्यक वाटतील अशा फेरबदलांसह, कोणतेही असल्यास, आपली मान्यता देईल.

**३९.** (१) पहिल्या आदेशांव्यतिरिक्त इतर सर्व आदेश, विद्यापरिषदेकडून काढण्यात येतील आणि त्यांस व्यवस्थापन मंडळाची मान्यता मिळाल्यानंतर ते, नियामक मंडळाच्या मान्यतेसाठी त्याच्याकडे सादर करण्यात येतील. नंतरचे आदेश.

(२) विद्यापरिषद, एकतर व्यवस्थापन मंडळाच्या व नियामक मंडळाच्या सूचनांचा अंतर्भाव करून आदेशांमध्ये फेरबदल करील किंवा त्या सूचनांचा अंतर्भाव न करण्याची कारणे देईल, आणि अशा कारणांसह, कोणतीही असल्यास, आदेश परत पाठवील आणि व्यवस्थापन मंडळ आणि नियामक मंडळ, विद्यापरिषदेच्या सूचना विचारात घेतील आणि अशा फेरबदलांसह किंवा फेरबदलांशिवाय, विद्यापीठाच्या आदेशांना मान्यता देतील आणि त्यानंतर, नियामक मंडळाने मान्यता दिल्याप्रमाणे ते आदेश अंमलात येतील.

**४०.** विद्यापीठाच्या प्राधिकरणांना, व्यवस्थापन मंडळाच्या पूर्व मान्यतेच्या अधीन राहून, त्यांचे स्वतःचे आणि त्यांनी नियुक्त केलेल्या समित्यांचे कामकाज चालवण्यासाठी, या अधिनियमांच्या तरतुदींशी आणि त्याखाली केलेले नियम, परिनियम किंवा आदेश यांच्याशी सुसंगत असे विनियम करता येतील. विनियम.

प्रवेश. **४१.** (१) विद्यापीठामधील प्रवेश, गुणवत्तेच्या आधारावर काटेकोरपणे देण्यात येईल.

(२) विद्यापीठामधील प्रवेशाची गुणवत्ता, एकतर प्रवेशासाठी असलेल्या अर्हताकारी परीक्षेमध्ये मिळालेल्या गुणांच्या किंवा श्रेणीच्या आधारे आणि अभ्यासानुवर्ती व अभ्यासेतर कार्यक्रमांमधील संपादणुकींच्या आधारे किंवा एकतर तत्सम पाठ्यक्रम चालविणाऱ्या विद्यापीठांच्या संघाने किंवा राज्यातील कोणत्याही अभिकरणाने राज्य स्तरावर घेतलेल्या प्रवेश चाचणीत मिळालेल्या गुणांच्या किंवा श्रेणीच्या आधारे निर्धारित करता येईल :

परंतु, व्यावसायिक व तंत्र पाठ्यक्रमांमधील प्रवेश, केवळ प्रवेश चाचणी मार्फतच देण्यात येतील.

(३) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, विशेष मागास प्रवर्ग व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (ईडब्ल्यूएस) यांमधील विद्यार्थ्यांकरिता आणि दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता विद्यापीठांमधील प्रवेशासाठी राज्य शासनाच्या धोरणानुसार जागा राखून ठेवण्यात येतील.

(४) एकूण मंजूर प्रवेश क्षमतेपैकी चाळीस टक्के जागा, महाराष्ट्र राज्यात अधिवास असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी राखून ठेवण्यात येतील.

शुल्क निश्चिती समिती. **४२.** (१) विद्यापीठास, विविध पाठ्यक्रमांसाठी व त्यामधील देऊ केलेल्या अध्ययनक्रमांसाठी शुल्क संरचना ठरविण्याकरिता शुल्क निश्चिती समिती घटित करता येईल. अशा शुल्क निश्चिती समितीची रचना व तिने अनुसरण करावयाची कार्यपद्धती, परिनियमांद्वारे विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

(२) समिती, प्रस्तावित शुल्क,—

(क) (एक) विद्यापीठाचा आवर्ती खर्च भागविण्यासाठी संसाधने निर्माण करण्याकरिता ; आणि

(दोन) विद्यापीठाच्या पुढील विकासासाठी आवश्यक असलेल्या बचतीसाठी,

पुरेसे आहे ;

(ख) अवाजवी नाही ; आणि

(ग) नफाखोरी करण्यायोग्य नाही,

किंवा कसे हे विचारात घेतल्यानंतर, शुल्क संरचना तयार करील व ती अंतिम करील.

(३) शासनास, विद्यापीठाच्या शुल्क संरचनेचे पुनर्विलोकन करण्याचा अधिकार असेल आणि अशा पुनर्विलोकनानंतर, ते, तिच्या शुल्क संरचनेत यथोचित सुधारणा करण्याचे निदेश विद्यापीठास देईल आणि विद्यापीठ, या निदेशांची अंमलबजावणी करील.

(४) राज्य शासन, विद्यापीठांमध्ये प्रवेश घेतलेल्या मागास प्रवर्गांमधील विद्यार्थ्यांकरिता कोणत्याही शुल्कांची प्रतिपूर्ती करणार नाही किंवा कोणतेही वित्तीय दायित्व घेणार नाही.

(५) विद्यापीठ, या कलमाअन्वये ते ज्यासाठी हककदार आहे त्याव्यतिरिक्त अन्य कोणतेही शुल्क,–मग त्यास कोणत्याही नावाने संबोधण्यात येवो,– आकारणार नाही.

कॅपिटेशन शुल्क घेण्यास मनाई. **४३.** (१) विद्यापीठाद्वारे किंवा त्याच्यावतीने अथवा जिच्याकडे अशा परिसंस्थेचा प्रभार आहे, किंवा जी, अशा परिसंस्थेच्या व्यवस्थापनास जबाबदार आहे अशा कोणत्याही व्यक्तीद्वारे, अशा परिसंस्थेतील कोणत्याही अभ्यास पाठ्यक्रमाला कोणत्याही विद्यार्थ्याला प्रवेश देण्याच्या किंवा तो पुढे चालू ठेवण्याच्या किंवा त्याला वरच्या इयत्तेत किंवा वर्गात घालण्याच्या मोबदल्यात विद्यार्थ्याकडून किंवा त्याच्या संबंधात, कोणतेही कॅपिटेशन शुल्क वसूल करण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, व्यवस्थापनास, नवीन शैक्षणिक परिसंस्था सुरू करण्यासाठी किंवा शिष्यवृत्त्या, पारितोषिके किंवा तत्सम गोष्टी देण्यासाठी दाननिधी निर्माण करण्यासाठी दानशूर व्यक्तींकडून किंवा संघटनांकडून किंवा सार्वजनिक न्यासांकडून किंवा व्यक्तींच्या इतर कोणत्याही अधिसंघाकडून विहित रीतीने, रोख रकमेच्या किंवा वस्तूच्या स्वरूपात सद्‌भावनापूर्वक देणग्या गोळा करता येतील किंवा त्या स्वीकारता येतील, परंतु, अशा देणग्या गोळा करताना किंवा स्वीकारताना, व्यवस्थापन, ते चालवित असलेल्या

कोणत्याही शैक्षणिक परिसंस्थेमध्ये, अशा देणग्यांच्या मोबदल्यात कोणत्याही जागा राखीव ठेवणार नाही. जेव्हा अशा देणग्या स्वीकारण्याच्या मोबदल्यात अशा परिसंस्थेत कोणत्याही विद्यार्थ्याला प्रवेश देण्याकरिता कोणतीही
१९८८ चा महा. ६. जागा राखून ठेवली असेल त्याबाबतीत, अशा देणगीच्या स्वीकृतीस, महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॅपिटेशन शुल्क घेण्यास प्रतिबंध) अधिनियम, १९८७ याच्या कलम २ च्या खंड (अ) च्या अर्थांतर्गत, कॅपिटेशन शुल्क वसूल केल्याचे मानण्यात येईल.

**४४.** प्रत्येक शैक्षणिक सत्राच्या सुरुवातीस आणि कोणत्याही परिस्थितीत, प्रत्येक कॅलेंडर वर्षाच्या ३० जूनच्या आत, विद्यापीठ, ते आयोजित करीत असलेल्या प्रत्येक पाठ्यक्रमासाठी परीक्षांचे सत्रनिहाय किंवा, यथास्थिति, वार्षिक वेळापत्रक तयार करील आणि ते प्रसिद्ध करील आणि त्या वेळापत्रकाचे काटेकोरपणे अनुपालन करील : परीक्षांचे वेळापत्रक

परंतु, जर कोणत्याही कारणास्तव, विद्यापीठास, या वेळापत्रकाचे अनुपालन करणे अशक्य असेल तर, ते, त्याचे अनुपालन न करण्याची तपशीलवार कारणे नमूद केलेला अहवाल, परीक्षांचे वेळापत्रक प्रसिद्ध झाल्यापासून शक्य तितक्या लवकर शासनाला सादर करील. शासनास, भविष्यात अधिक चांगले अनुपालन होण्यासाठी त्याला योग्य वाटतील असे निदेश, त्यावर देता येतील.

**४५.** (१) विद्यापीठ, त्याने घेतलेल्या प्रत्येक परीक्षेचा निकाल, त्या विशिष्ट पाठ्यक्रमाच्या परीक्षेच्या अखेरच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत जाहीर करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करील आणि कोणत्याही परिस्थितीत असा निकाल, अशा दिनांकापासून उशिरात उशिरा पंचेचाळीस दिवसांच्या आत जाहीर करील : निकाल जाहिर करणे.

परंतु, जर कोणत्याही कारणास्तव पंचेचाळीस दिवसांच्या कालावधीच्या आत, कोणत्याही परीक्षेचा निकाल अंतिमरीत्या जाहीर करणे विद्यापीठाला शक्य झाले नाही तर, ते, अशा विलंबाची तपशीलवार कारणे समाविष्ट असलेला अहवाल, शासनाला सादर करील. शासनास, भविष्यात अधिक चांगले अनुपालन होण्यासाठी त्याला योग्य वाटतील असे निदेश, त्यावर देता येतील.

(२) विद्यापीठाने, या अधिनियमाच्या कलम ४४ मध्ये करारनिविष्ट केल्याप्रमाणे परीक्षांच्या वेळापत्रकाचे अनुपालन केले नाही, किंवा पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत निकाल जाहीर करण्यात विद्यापीठाने कसूर केली आहे, केवळ एवढ्याच कारणांवरून कोणतीही परीक्षा किंवा परीक्षेचा निकाल अवैध असल्याचे मानण्यात येणार नाही.

**४६.** विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ, पदव्या, पदविका प्रदान करण्याकरिता किंवा इतर कोणत्याही प्रयोजनाकरिता परिनियमांद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रीतीने प्रत्येक शैक्षणिक वर्षात आयोजित करण्यात येईल. दीक्षांत समारंभ.

**४७.** विद्यापीठ, त्याच्या स्थापनेपासून पाच वर्षांच्या आत, राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषद (नॅक), बंगलोरकडून अधिस्वीकृती मिळवील आणि राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेने (नॅकने) विद्यापीठाला दिलेल्या श्रेणीविषयी ते, शासनाला व विद्यापीठाने हाती घेतलेल्या पाठ्यक्रमांशी संबंधित असलेल्या अशा इतर नियामक मंडळांना कळवील. विद्यापीठ, त्यानंतर प्रत्येक पाच वर्षांच्या कालांतराने अशा अधिस्वीकृतीचे नूतनीकरण करवून घेईल. विद्यापीठाची अधिस्वीकृती

**४८.** या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, विनियामक मंडळांचे सर्व नियम, विनियम, मानके, इत्यादींचे अनुपालन करणे आणि अशा मंडळांना, त्यांची कर्तव्ये बजावण्यासाठी आणि त्यांची कार्ये पार पाडण्यासाठी त्यांना त्यांच्याकडून फर्माविण्यात येतील अशा सर्व सोयीसुविधा व सहाय्य पुरविणे, विद्यापीठावर बंधनकारक असेल. विनियामक मंडळाचे नियम, विनियम, मानके, इत्यादींचे, विद्यापीठाने अनुपालन करणे.

**४९.** (१) विद्यापीठाचा वार्षिक अहवाल, व्यवस्थापन मंडळाकडून तयार करण्यात येईल, त्यात इतर बाबींबरोबरच विद्यापीठाने त्याच्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी केलेल्या उपाययोजनांचा समावेश असेल आणि त्यास नियामक मंडळाकडून मान्यता देण्यात येईल आणि त्याची एक प्रत, प्रायोजक मंडळाला सादर करण्यात येईल. वार्षिक अहवाल.

(२) पोट-कलम (१) अन्वये तयार केलेल्या वार्षिक अहवालाच्या प्रती, शासनालादेखील सादर करण्यात येतील.

(३) राज्य शासन, असा अहवाल, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्याची व्यवस्था करील.

वार्षिक लेखे व लेखापरीक्षा.

**५०.** (१) विद्यापीठाचे वार्षिक लेखे व ताळेबंद, व्यवस्थापन मंडळाच्या निदेशांन्वये तयार करण्यात येतील आणि या प्रयोजनासाठी विद्यापीठाने नियुक्त केलेल्या लेखापरीक्षकांकडून प्रत्येक वर्षी किमान एकदा वार्षिक लेख्यांची लेखापरीक्षा करण्यात येईल.

(२) लेखापरीक्षा अहवालासह वार्षिक लेख्यांची एक प्रत, नियामक मंडळाला सादर करण्यात येईल.

(३) नियामक मंडळाच्या अभिप्रायांसह वार्षिक लेख्यांची व लेखापरीक्षा अहवालाची एक प्रत, प्रायोजक मंडळाला सादर करण्यात येईल.

(४) पोट-कलम (१) अन्वये तयार केलेल्या वार्षिक लेख्यांच्या व ताळेबंदाच्या प्रती, शासनाला देखील सादर करण्यात येतील.

(५) विद्यापीठाचे लेखे व लेखापरीक्षा अहवाल यांवरील शासनाचे मत, कोणतेही असल्यास, नियामक मंडळासमोर मांडण्यात येईल आणि नियामक मंडळ, त्याला योग्य वाटतील असे निदेश देईल आणि त्यांच्या अनुपालनाबाबत शासनाला कळविण्यात येईल.

निरीक्षण करण्याचे शासनाचे अधिकार.

**५१.** (१) शासनास, या अधिनियमाच्या तरतुदींची आणि त्याखाली केलेले नियम, परिनियम किंवा आदेश यांची अंमलबजावणी किंवा अनुपालन करण्यासाठी विद्यापीठाला निदेश देता येतील.

(२) शासनास, या अधिनियमातील तरतुदींचे योग्य अनुपालन केले जात असल्याची खात्री करण्यासाठी अशा निरीक्षणाची पूर्वसूचना दिल्यानंतर, कोणत्याही वेळी, विद्यापीठाच्या प्रशासनाचे व कामकाजाचे निरीक्षण करण्यासाठी समिती नेमता येईल.

(३) शासनास, कालबद्ध अनुपालनासाठी किंवा पोट-कलम (२) अन्वये नेमलेल्या समितीने निदर्शनास आणून दिलेल्या त्रुटी दूर करण्यासाठी विद्यापीठाला निदेश देता येतील.

(४) अध्यापन, परीक्षा व संशोधनाची प्रमानके किंवा विद्यापीठाशी संबंधित असणारी इतर कोणतीही बाब यांची सुनिश्चिती करण्याच्या प्रयोजनांसाठी, शासनास, कुलगुरूशी विचारविनिमय केल्यानंतर, त्याला योग्य वाटेल अशा व्यक्तीकडून किंवा व्यक्तींकडून, नियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा रीतीने, मूल्यनिर्धारण करण्याची व्यवस्था करता येईल.

(५) शासन, सुधारात्मक कारवाईसाठी अशा मूल्यनिर्धारणाच्या परिणामासंबंधातील त्याच्या शिफारशी विद्यापीठाला कळवील आणि विद्यापीठ, त्या शिफारशींचे अनुपालन केल्याची सुनिश्चिती करण्यासाठी आवश्यक असतील अशा सुधारात्मक उपाययोजना हाती घेईल.

(६) जर पोट-कलम (५) अन्वये केलेल्या शिफारशींचे वाजवी वेळेच्या आत, अनुपालन करण्यात विद्यापीठाने कसूर केली असेल तर, शासनास, त्याला योग्य वाटतील असे निदेश देता येतील, जे विद्यापीठावर बंधनकारक असतील.

प्रायोजक मंडळाकडून विद्यापीठाचे विसर्जन.

**५२.** (१) प्रायोजक मंडळास, शासनास, विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांना व विद्यार्थ्यांना तशा आशयाची किमान एक वर्ष आगाऊ नोटीस देऊन विद्यापीठ विसर्जित करता येईल :

परंतु, नियमित पाठ्यक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या शेवटच्या तुकडीने त्यांचा पाठ्यक्रम पूर्ण केल्यानंतरच आणि त्यांना पदव्या, पदविका किंवा, यथास्थिति, पुरस्कार प्रदान करण्यात आल्यानंतरच केवळ विद्यापीठाचे विसर्जन अंमलात येईल.

(२) विद्यापीठाचे विसर्जन केल्यावर, विद्यापीठाच्या सर्व मत्ता व दायित्वे ही, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याच्या तरतुदींच्या अधीन राहून, प्रायोजक मंडळाकडे निहित होतील.

विवक्षित परिस्थितींमध्ये राज्य शासनाचे विशेष अधिकार असणे.

**५३.** (१) जर विद्यापीठाने या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींचे आणि त्याखाली केलेले कोणतेही नियम, परिनियम किंवा आदेश यांचे उल्लंघन केले आहे किंवा या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या कोणत्याही निदेशांचे उल्लंघन केले आहे किंवा या अधिनियमाच्या कलम ५ अन्वये दिलेल्या कोणत्याही हमींची अंमलबजावणी करण्याचे बंद केले आहे, किंवा विद्यापीठामध्ये आर्थिक गैरव्यवस्थापनाची किंवा कुप्रशासनाची परिस्थिती उद्भवली

आहे, असे शासनास दिसून आले तर, शासन, विद्यापीठाचे परिसमापन करण्याचा आदेश का देण्यात येऊ नये याबाबत पंचेचाळीस दिवसांच्या आत, कारणे दाखविण्यासाठी विद्यापीठास नोटीस काढील.

(२) शासनाची, जर पोट-कलम (१) अन्वये काढलेल्या नोटीशीवरील विद्यापीठाचे उत्तर मिळाल्यावर, या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही तरतुदींचे आणि त्याखाली केलेले नियम, परिनियम किंवा आदेश यांचे उल्लंघन केले असल्याचे किंवा या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांचे उल्लंघन केले असल्याचे किंवा या अधिनियमाच्या कलम ५ अन्वये दिलेल्या हमीची अंमलबजावणी करण्याचे बंद केले असल्याचे किंवा आर्थिक गैरव्यवस्थापनाचे अथवा कुप्रशासनाचे प्रथमदर्शनी प्रकरण असल्याबाबत खात्री पटली असेल तर, शासन, त्यास आवश्यक वाटेल अशी चौकशी करण्याचे आदेश देईल.

(३) शासन, पोट-कलम (२) खालील कोणत्याही चौकशीच्या प्रयोजनार्थ, कोणत्याही आरोपांची चौकशी करण्यासाठी आणि त्यावर अहवाल देण्यासाठी चौकशी अधिकाऱ्याची किंवा अधिकाऱ्यांची नियुक्ती करील.

(४) पोट-कलम (३) अन्वये नियुक्त केलेल्या चौकशी अधिकाऱ्याला किंवा अधिकाऱ्यांना, पुढील बाबीसंबंधात, एखाद्या दाव्याची न्यायचौकशी करताना, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ खालील दिवाणी न्यायालयाकडे जे अधिकार निहित केलेले असतात तसेच अधिकार असतील :— १९०८ चा ५.

(क) कोणत्याही व्यक्तीला समन्स पाठवणे व तिला उपस्थित राहण्यास भाग पाडणे आणि तिची शपथेवर तपासणी करणे ;

(ख) पुराव्यात सादर करता येईल अशा कोणत्याही दस्तऐवजाचा किंवा अन्य कोणत्याही वस्तूचा शोध घेण्यास आणि ती सादर करण्यास फर्मावणे ;

(ग) कोणत्याही न्यायालयातून किंवा कार्यालयातून कोणताही सार्वजनिक अभिलेख मागविणे ; आणि

(घ) नियमांद्वारे विहित करण्यात येईल अशी, इतर कोणतीही बाब.

(५) या अधिनियमान्वये चौकशी करणारा चौकशी अधिकारी हा किंवा चौकशी अधिकारी हे, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याचे कलम १९५ आणि प्रकरण २६ यांच्या प्रयोजनांसाठी दिवाणी न्यायालय असल्याचे मानण्यात येतील. १९७४ चा २.

(६) पोट-कलम (३) अन्वये नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याकडून किंवा अधिकाऱ्यांकडून चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर, जर विद्यापीठाने या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही तरतुदींचे, त्याखाली केलेले नियम, परिनियम किंवा आदेश यांचे उल्लंघन केले आहे किंवा या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या कोणत्याही निदेशांचा भंग केला आहे किंवा कलम ५ अन्वये त्याने दिलेल्या हमीची अंमलबजावणी करण्याचे बंद केले आहे, किंवा विद्यापीठाच्या विद्याविषयक दर्जास धोका निर्माण होईल अशी, आर्थिक गैरव्यवस्थापनाची किंवा कुप्रशासनाची परिस्थिती विद्यापीठामध्ये उद्भवली आहे अशी शासनाची खात्री पटली तर, ते, विद्यापीठाचे परिसमापन करण्याचे प्रारंभिक आदेश देईल आणि प्रशासकाची नियुक्ती करील.

(७) पोट-कलम (६) अन्वये नियुक्त केलेल्या प्रशासकास, या अधिनियमाखालील नियामक मंडळाचे व व्यवस्थापन मंडळाचे सर्व अधिकार असतील आणि त्याने, त्यांची सर्व कर्तव्ये पार पाडणे भाग असेल आणि तो, विद्यापीठाच्या नियमित पाठ्यक्रमाच्या शेवटच्या तुकडीतील विद्यार्थी, त्यांचा पाठ्यक्रम पूर्ण करीपर्यंत आणि त्यांना पदवी, पदविका किंवा, यथास्थिति, पुरस्कार प्रदान करण्यात येईपर्यंत, विद्यापीठाचे कामकाज पाहील.

(८) नियमित पाठ्यक्रमांच्या शेवटच्या तुकडीतील विद्यार्थ्यांना पदवी, पदविका किंवा, यथास्थिति, पुरस्कार प्रदान करण्यात आल्यानंतर, प्रशासक, तशा आशयाचा अहवाल शासनाला सादर करील.

(९) शासन, पोट-कलम (८) खालील अहवाल प्राप्त झाल्यावर, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, विद्यापीठ विसर्जित करणारा अंतिम आदेश काढील आणि अशी अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून, ते विद्यापीठ विसर्जित होईल, आणि विद्यापीठाच्या सर्व मत्ता व दायित्वे, अशा दिनांकापासून प्रायोजक मंडळाकडे निहित होतील.

**५४.** या अधिनियमाच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करणे हा अपराध ठरेल, आणि विद्यापीठ तसेच, कलम १६ अन्वये विनिर्दिष्ट केलेले विद्यापीठाचे सर्व अधिकारी, तीन महिन्यांपेक्षा कमी नसेल परंतु, जी एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या आणि पन्नास हजार रुपयांपेक्षा कमी नसेल, परंतु पाच लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असतील : शिक्षा.

परंतु, या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, अधिनियमाच्या तरतुदींचे अनुपालन न केल्याबद्दल विद्यापीठाच्या परिसमापनाच्या कारवाईसह कोणतीही कारवाई,– मग ती दिवाणी असो किंवा फौजदारी असो,– सुरू करण्यापासून शासनास प्रतिबंध होतो, असा त्याचा अन्वयार्थ लावण्यात येणार नाही.

कंपन्यांनी केलेले अपराध.

**५५.** (१) जेव्हा या अधिनियमाखालील किंवा त्याखाली केलेल्या नियमांखालील एखादा अपराध एखाद्या कंपनीने केला असेल त्याबाबतीत, असा अपराध करण्यात आला त्यावेळी जी व्यक्ती कंपनीची प्रभारी होती, आणि कंपनीचे कामकाज चालवण्यास जबाबदार होती अशी प्रत्येक व्यक्ती तसेच कंपनी देखील, त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार त्यांच्याविरुद्ध खटला दाखल केला जाण्यास आणि शिक्षा केली जाण्यास पात्र असेल :

परंतु, जर त्या व्यक्तीने, असा अपराध तिच्या नकळत घडला होता किंवा असा अपराध घडण्यास प्रतिबंध करण्यासाठी तिने सर्व वाजवी दक्षता घेतली होती असे शाबीत केले तर, या पोट-कलमात काहीही अंतर्भूत असले तरी, अशी कोणतीही व्यक्ती, कोणत्याही शिक्षेस पात्र ठरणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा या अधिनियमाखालील किंवा त्याखाली केलेल्या नियमांखालील कोणताही अपराध, एखाद्या कंपनीने केला असेल आणि तो अपराध, त्या कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी किंवा कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या संमतीने किंवा मुकसंमतीने करण्यात आला असेल अथवा त्यांनी किंवा त्यांनी केलेल्या निष्काळजीपणामुळे घडून आला असेल त्याबाबतीत, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा इतर अधिकारी किंवा कर्मचारी देखील त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्यांच्याविरूद्ध खटला दाखल केला जाण्यास आणि त्यानुसार शिक्षा केली जाण्यास पात्र असेल.

**स्पष्टीकरण.––** या कलमाच्या प्रयोजनार्थ,––

(क) " कंपनी " याचा अर्थ, निगम निकाय असा असून त्यामध्ये, विश्वस्त संस्थेचा, भागीदारी संस्थेचा, सोसायटीचा, संस्थेचा किंवा व्यक्तींच्या अन्य संघाचा समावेश होतो ;

(ख) (एक) भागीदारी संस्थेच्या संबंधात, "संचालक" याचा अर्थ, भागीदारी संस्थेतील भागीदार, असा आहे ; आणि

(दोन) एखादी सोसायटी, विश्वस्त संस्था, परिसंस्था किंवा व्यक्तींचा अन्य संघ किंवा व्यक्तींचा निकाय यांच्या संबंधात, "संचालक" याचा अर्थ, सोसायटीच्या, विश्वस्त संस्थेच्या, परिसंस्थेच्या किंवा अन्य संघाच्या, किंवा यथास्थिति, निकायाच्या कामकाजाच्या व्यवस्थापनासह सोसायटीच्या, विश्वस्त संस्थेच्या, परिसंस्थेच्या किंवा अन्य संघाच्या किंवा निकायाच्या नियमांन्वये किंवा उप विधिअन्वये हितसंबंधित असलेली व्यक्ती, असा आहे.

नियम करण्याचा अधिकार.

**५६.** (१) शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, नियम करता येतील.

(२) या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा अधिक अधिवेशनांत मिळून एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता सत्रासीन असताना, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत होईल किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत होईल आणि तशा अर्थाचा त्यांचा निर्णय, **शासकीय राजपत्रात** अधिसूचित करतील तर, तो नियम, असा निर्णय, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून केवळ अशा फेरबदल केलेल्या स्वरुपातच अंमलात येईल किंवा, यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही ; तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा विलोपनामुळे, त्या नियमान्वये यापूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

**५७.** त्याकाळी अस्तित्वात असलेल्या शासकीय आदेशांनुसार किंवा शासननिर्णयांनुसार स्वयं-अर्थसहाय्यित खाजगी विद्यापीठ स्थापन करण्याची प्रक्रिया, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किंवा त्यापूर्वी एखाद्या विशिष्ट टप्प्यावर पूर्ण झाली असेल तर, या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, या अधिनियमातील तरतुदींनुसार अशा पुढील टप्प्यापासून अशी प्रक्रिया नियमितपणे सुरू राहील. संक्रमणकालीन तरतूद.

**५८.** (१) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास व तेव्हापासून पुढील अधिनियम निरसित होतील :– निरसन व व्यावृत्ती.

२०१४ चा महा. १३. (क) अमिटी विद्यापीठ अधिनियम, २०१४;

२०१४ चा महा. १४. (ख) स्पायसर ॲडवेनटिस्ट विद्यापीठ अधिनियम, २०१४;

२०१५ चा महा. २. (ग) फ्लेम विद्यापीठ अधिनियम, २०१४;

२०१५ चा महा. ३. (घ) अजिंक्य डी. वाय. पाटील विद्यापीठ अधिनियम, २०१४;

२०१५ चा महा. ३८. (ङ) संदीप विद्यापीठ अधिनियम, २०१५;

२०१५ चा महा. ३९. (च) एमआयटी आर्ट, डिझाईन ॲण्ड टेक्नॉलॉजी विद्यापीठ अधिनियम, २०१५;

२०१७ चा महा. ३५. (छ) डॉ. विश्वनाथ कराड एमआयटी विश्वशांती विद्यापीठ अधिनियम, २०१६;

२०१७ चा महा. ३७. (ज) सिम्बॉयोसिस कौशल्य व व्यावसायिक विद्यापीठ अधिनियम, २०१७;

२०१७ चा महा. ३८. (झ) विश्वकर्मा विद्यापीठ अधिनियम, २०१७;

२०१७ चा महा. ३९. (ञ) डिएसके वर्ल्ड विद्यापीठ अधिनियम, २०१७;

२०१७ चा महा. ४०. (ट) संजय घोडावत विद्यापीठ, कोल्हापूर, अधिनियम, २०१७;

२०१७ चा महा. ६३. (ठ) डी. वाय. पाटील इंटरनॅशनल विद्यापीठ, पुणे, अधिनियम, २०१७;

२०१८ चा महा. २९. (ड) जी. एच. रायसोनी विद्यापीठ, अमरावती, अधिनियम, २०१८;

२०१८ चा महा. ३२. (ढ) छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ, पनवेल, अधिनियम, २०१८;

२०१८ चा महा. ७७. (ण) विजयभूमी विद्यापीठ, रायगड, अधिनियम, २०१८;

(त) सोमय्या विद्याविहार विद्यापीठ, मुंबई अधिनियम, २०१९; २०१९ चा महा. ५.

(थ) डी. वाय. पाटील विद्यापीठ, पुणे अधिनियम, २०१९; २०१९ चा महा. ६.

(द) श्री बालाजी विद्यापीठ, पुणे अधिनियम, २०१९; २०१९ चा महा. १२.

(ध) रामदेवबाबा विद्यापीठ, नागपूर अधिनियम, २०१९; २०१९ चा महा. १३.

(न) एमजीएम विद्यापीठ, औरंगाबाद अधिनियम, २०१९; २०१९ चा महा. २६.

(प) डी. वाय. पाटील कृषी व तंत्र विद्यापीठ, तळसंदे, कोल्हापूर अधिनियम, २०२०; २०२० चा महा. ३६.

(फ) निकमार विद्यापीठ, पुणे अधिनियम, २०२२; २०२२ चा महा. ३६.

(ब) डॉ. पी. ए. इनामदार विद्यापीठ, पुणे अधिनियम, २०२२; २०२२ चा महा. ३७.

(भ) युनिव्हर्सल ए आय विद्यापीठ, कर्जत अधिनियम, २०२२; २०२३ चा महा. ३.

(म) जेएसपीएम विद्यापीठ, पुणे अधिनियम, २०२२; २०२३ चा महा. ४.

(य) पिंपरी-चिंचवड विद्यापीठ, पुणे अधिनियम, २०२२; २०२३ चा महा. ५.

(यक) एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठ, सोलापूर अधिनियम, २०२३; २०२३ चा महा. ३८.

(यख) डीईएस पुणे विद्यापीठ, पुणे, अधिनियम, २०२३. २०२३ चा महा. ३९.

(२) उक्त अधिनियमांचे निरसन झाले असले तरीही,—

(एक) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी विद्यमान विद्यापीठाचा कुलगुरू म्हणून पद धारण करणारी कोणतीही व्यक्ती, अशा प्रारंभापासून तत्सम विद्यापीठाचा कुलगुरू असेल आणि पूर्वोक्तप्रमाणे त्याचा पदावधी समाप्त होण्यापूर्वी, मृत्यू, राजीनामा किंवा अन्य कारणांमुळे तो कुलगुरू असण्याचे बंद झाला नसेल तर, त्याने असे पद धारण केले असते त्याप्रमाणे त्याचा पदावधी समाप्त होईपर्यंत विद्यमान विद्यापीठाचा कुलगुरू म्हणून उक्त पद धारण करण्याचे चालू राहील आणि या अधिनियमाद्वारे किंवा त्या अन्वये तत्सम विद्यापीठाच्या कुलगुरूला प्रदान केलेल्या आणि त्याच्यावर सोपविण्यात आलेल्या सर्व अधिकारांचा वापर करण्याचे व सर्व कर्तव्ये पार पाडण्याचे चालू ठेवील ;

(दोन) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी घटित केलेल्या विद्यमान विद्यापीठाचे प्रत्येक प्राधिकरण हे, या अधिनियमाखालील तत्सम विद्यापीठाचे तत्सम प्राधिकरण असल्याचे मानण्यात येईल ;

(तीन) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वीच्या दिनांकास विद्यमान विद्यापीठाचे, एकतर अधिकारी किंवा कर्मचारी (मग ते अध्यापन करणारे किंवा अन्य कर्मचारी असोत) म्हणून पद धारण करणारी प्रत्येक व्यक्ती, अशा दिनांकाच्या लगतपूर्वी, तिला ज्या लागू होत्या त्याच अटी व शर्तींवर, नियमितपणे पद धारण करील, आणि या अधिनियमाद्वारे किंवा त्या अन्वये तिला जे प्रदान करण्यात आलेले आहेत अशा अधिकारांचा वापर करील व अशी कर्तव्ये पार पाडील ;

(चार) कोणत्याही विद्यमान विद्यापीठाची सर्व जंगम किंवा स्थावर मालमत्ता, आणि सर्व हक्क, कोणत्याही प्रकारचे हितसंबंध, अधिकार व विशेषाधिकार हे, तत्सम विद्यापीठाकडे हस्तांतरित होतील आणि आणखी कोणत्याही हमीशिवाय तत्सम विद्यापीठाकडे निहित होतील आणि ज्या उद्दिष्टांसाठी व प्रयोजनांसाठी विद्यापीठ घटित करण्यात आले आहे त्या प्रयोजनांसाठी व उद्दिष्टांसाठी त्यांचा वापर करण्यात येईल ;

(पाच) विद्यमान विद्यापीठाने स्वीकारलेल्या किंवा त्यांना मिळालेल्या आणि या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी त्यांनी धारण केलेल्या सर्व देणग्या, या अधिनियमाखालील तत्सम विद्यापीठाने

स्वीकारलेल्या किंवा त्याला मिळालेल्या किंवा त्याने धारण केलेल्या असल्याचे मानण्यात येईल आणि ज्या शर्तींवर अशा देणग्या स्वीकारल्या किंवा मिळाल्या किंवा धारण केल्या होत्या त्या सर्व शर्ती, या अधिनियमाच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदींशी विसंगत असल्या तरीही, या अधिनियमान्वये विधिग्राह्य असल्याच्या मानण्यात येतील ;

(सहा) विद्यमान विद्यापीठाने या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी पत्करलेली आणि त्याच्या नावे वैधरीत्या अस्तित्वात असलेली सर्व कर्जे, दायित्वे व आबंधने, तत्सम विद्यापीठाकडून परतफेड करण्यात येतील व त्याची पूर्तता करण्यात येईल ;

(सात) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी, विद्यमान विद्यापीठाच्या नावे केलेले कोणतेही मृत्यूपत्रित दान, बक्षिस, आबंधन किंवा विश्वस्त निधी यांचा अंतर्भाव असलेले कोणतेही इच्छापत्र, विलेख किंवा अन्य दस्तऐवज यांचा, या अधिनियमाच्या प्रारंभास व तेव्हापासून, त्यात जणू काही विद्यमान विद्यापीठाऐवजी तत्सम विद्यपीठाचे नाव दिलेले आहे असे समजून अन्वयार्थ लावण्यात येईल ;

(आठ) कोणत्याही अधिनियमितीमधील किंवा कोणत्याही अधिनियमिती अन्वये काढलेल्या इतर संलेखांतील कोणत्याही विद्यमान विद्यापीठाच्या सर्व संदर्भांचा, जणू काही तो तत्सम विद्यापीठाचा संदर्भ आहे असे समजून, त्याचा अन्वयार्थ लावण्यात येईल ;

(नऊ) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी कोणत्याही विद्यमान विद्यापीठाच्या बाबतीत, उक्त अधिनियमान्वये जे विद्यापीठाचे मान्यताप्राप्त अध्यापक होते असे अध्यापक, या अधिनियमान्वये आणि अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, तत्सम विद्यापीठाचे मान्यताप्राप्त अध्यापक असल्याचे मानण्यात येतील आणि या अधिनियमानुसार नवीन मान्यता देण्यात येईपर्यंत, ते असे मान्यताप्राप्त अध्यापक म्हणून असण्याचे चालू राहतील ;

(दहा) कोणत्याही विद्यमान विद्यापीठाच्या बाबतीत, उक्त अधिनियमांन्वये केलेले सर्व नियम, परिनियम, आदेश किंवा विनियम, जेथवर ते या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील तेथवर, अंमलात असण्याचे चालू राहतील आणि या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे, परिनियमांद्वारे, आदेशांद्वारे किंवा विनियमांद्वारे ते अधिक्रमित करण्यात येईपर्यंत अथवा त्यात फेरबदल करण्यात येईपर्यंत, ते, तत्सम विद्यापीठाच्या किंवा यथास्थिति, त्या विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाच्या बाबतीत, या अधिनियमान्वये करण्यात आले असल्याचे मानण्यात येतील ;

(अकरा) उक्त अधिनियमांपैकी कोणत्याही अधिनियमान्वये कोणत्याही प्राधिकरणाने दिलेल्या किंवा काढलेल्या सर्व नोटिसा व आदेश हे, जेथवर ते या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील तेथवर, अंमलात असण्याचे चालू राहतील आणि या अधिनियमान्वये ते अधिक्रमित करण्यात येईपर्यंत अथवा त्यांत फेरबदल करण्यात येईपर्यंत तत्सम प्राधिकरणाने दिलेले आदेश किंवा काढलेल्या नोटिसा असल्याचे मानण्यात येतील :

परंतु, या कलमाद्वारे निरसित केलेल्या अधिनियमांपैकी कोणत्याही अधिनियमान्वये केलेले किंवा काढलेले आणि या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी अंमलात असलेले कोणतेही नियम, परिनियम, आदेश, विनियम, नोटिसा अथवा आदेश हे, या अधिनियमान्वये असे नियम, परिनियम, आदेश, विनियम, नोटीस किंवा आदेश नियम करण्याचा अथवा काढण्याचा अधिकार, वेगळ्या प्राधिकरणात अथवा मंडळात किंवा अधिकाऱ्याकडे निहित आहे या, अथवा त्याचा प्रतिपाद्य विषय हा, या अधिनियमान्वये करावयाच्या दुय्यम विधिविधानाच्या अथवा संलेखाच्या वेगळ्या स्वरूपात अनुज्ञेय आहे केवळ या कारणांवरून या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत आहे असे मानण्यात येणार नाही.

**५९.** (१) या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना, कोणतीही अडचण उद्भवल्यास, शासनास, प्रसंगानुरूप उद्भवेल त्याप्रमाणे, ती अडचण दूर करण्यासाठी त्यास आवश्यक किंवा इष्ट असल्याचे वाटेल अशी या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे करता येईल : अडचणी दूर करण्याचा अधिकार.

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यावर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्यात येईल.

**अनुसूची**

**भाग एक**

(कलम ६ (४) पहा)

| अ.क्र. | विद्यमान विद्यापीठाचे नाव. | या अधिनियमाखालील संबंधित विद्यापीठाचे नाव, ठिकाण व मुख्यालये. | प्रायोजक मंडळाचे नाव व पत्ता. |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | अमिटी विद्यापीठ अधिनियम, २०१४ (२०१४ चा महा. १३) अन्वये स्थापन केलेले अमिटी विद्यापीठ . | अमिटी विद्यापीठ, मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग, भातान, पोष्ट-सोमाठणे, पनवेल-४१० २०६. | रीतनंद बलवेद एज्युकेशन फाऊंडेशन (आरबीईएफ), ई २७ डिफेन्स कॉलनी, नवी दिल्ली-११० २०६. |
| २. | स्पायसर ॲडवेनटिस्ट विद्यापीठ अधिनियम, २०१४ (२०१४ चा महा. १४) अन्वये स्थापन केलेले स्पायसर ॲडवेनटिस्ट विद्यापीठ, पुणे. | स्पायसर ॲडवेनटिस्ट विद्यापीठ, पुणे मुख्यालय औंध रोड, गणेशखिंड पोस्ट, पुणे, महाराष्ट्र. | अशलोक एज्युकेशन सोसायटी, पुणे. |
| ३. | फ्लेम विद्यापीठ अधिनियम, २०१४ (२०१५ चा महा. २) अन्वये स्थापन केलेले फ्लेम विद्यापीठ, पुणे. | फ्लेम विद्यापीठ, पुणे मुख्यालय लव्हळे, तालुका मुळशी, पुणे - ४११ ०४१. | फाउंडेशन फॉर लिबरल ॲंड मॅनेजमेंट एज्युकेशन सोसायटी, पुणे. |
| ४. | अजिंक्य डी. वाय. पाटील विद्यापीठ अधिनियम, २०१४ (२०१५ चा महा. ३) अन्वये स्थापन केलेले अजिंक्य डी. वाय. पाटील विद्यापीठ, पुणे. | अजिंक्य डी. वाय. पाटील विद्यापीठ, पुणे, मुख्यालय डॉ. डी. वाय पाटील नॉलेज सिटी, चऱ्होली बुद्रुक, व्हाया लोहगाव, पुणे - ४१२ १०५. | डॉ. डी. वाय पाटील इन्फ्रा फ्राउंडेशन. |
| ५. | संदीप विद्यापीठ अधिनियम, २०१५ (२०१५ चा महा. ३८) अन्वये स्थापन केलेले संदीप विद्यापीठ, मुख्यालय, नाशिक. | संदीप विद्यापीठ, नाशिक मुख्यालय त्र्यंबक मार्ग, मुक्काम पोष्ट महिरावणी, तालुका व जिल्हा नाशिक - ४२२ २१३. | संदीप फाउंडेशन, मुंबई. |
| ६. | एमआयटी आर्ट, डिझाईन ॲण्ड टेक्नॉलॉजी विद्यापीठ अधिनियम, २०१५ (२०१५ चा महा. ३९) अन्वये स्थापन केलेले एमआयटी आर्ट, डिझाईन ॲण्ड टेक्नॉलॉजी विद्यापीठ, पुणे. | एमआयटी आर्ट, डिझाईन ॲण्ड टेक्नॉलॉजी विद्यापीठ, पुणे मुख्यालय राजबाग, लोणी-काळभोर, पुणे. | ॲकेडमी ऑफ इंजिनियरिंग ॲंड एज्युकेशनल रिसर्च, पुणे. |
| ७. | डॉ. विश्वनाथ कराड एमआयटी विश्वशांती विद्यापीठ अधिनियम, २०१६ (२०१७ चा महा. ३५) अन्वये स्थापन केलेले डॉ. विश्वनाथ कराड एमआयटी विश्वशांती विद्यापीठ, पुणे. | डॉ. विश्वनाथ कराड एमआयटी विश्वशांती विद्यापीठ, पुणे मुख्यालय डॉ. विश्वनाथ कराड एमआयटी विश्वशांती विद्यापीठ, पुणे - ४११ ०३८. | ॲकेडमी ऑफ इंजिनियरिंग ॲंड एज्युकेशनल रिसर्च, पुणे. |
| ८. | सिम्बॉयोसिस कौशल्य व व्यावसायिक विद्यापीठ अधिनियम, २०१७ (२०१७ चा महा. ३७) अन्वये स्थापन केलेले सिम्बॉयोसिस कौशल्य व व्यावसायिक विद्यापीठ, पुणे. | सिम्बॉयोसिस कौशल्य व व्यावसायिक विद्यापीठ, पुणे सिम्बॉयोसिस कौशल्य व मुक्त विद्यापीठ, मुख्यालय किवळे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्र, पुणे-मुंबई द्रुतगती मार्ग, पुणे. | सिम्बॉयोसिस मुक्त शिक्षण सोसायटी. |

**अनुसूची**–चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ९. | विश्वकर्मा विद्यापीठ अधिनियम, २०१७ (२०१७ चा महा. ३८) अन्वये स्थापन केलेले विश्वकर्मा विद्यापीठ, पुणे. | विश्वकर्मा विद्यापीठ, पुणे मुख्यालय विश्वकर्मा विद्यापीठ सर्व्हे क्रमांक २/३/४ लक्ष्मी नगर, कोंढवा (बुद्रुक), पुणे - ४११ ०४८. | बन्सीलाल रामनाथ अगरवाल धर्मदाय न्यास. |
| १०. | डिएसके वर्ल्ड विद्यापीठ अधिनियम, २०१७ (२०१७ चा महा. ३९) अन्वये स्थापन केलेले डिएसके वर्ल्ड विद्यापीठ, पुणे. | डिएसके वर्ल्ड विद्यापीठ, पुणे, मुख्यालय सर्व्हे क्रमांक ५४/५५ फुरसुंगी, लोणी टोल नाक्याजवळ, पुणे-सोलापूर रोड, पुणे - ४१२ ३०८. | डिएसके वर्ल्ड शिक्षण परिषद. |
| ११. | संजय घोडावत विद्यापीठ, कोल्हापूर अधिनियम, २०१७ (२०१७ चा महा. ४०) अन्वये स्थापन केलेले संजय घोडावत विद्यापीठ, कोल्हापूर. | संजय घोडावत विद्यापीठ, कोल्हापूर मुख्यालय संजय घोडावत विद्यापीठ, अतिग्रे, तालुका हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर, महाराष्ट्र ४१६ ११८. | सौ. सुशिला दानचंद घोडावत चॅरिटेबल ट्रस्ट हा सार्वजनिक न्यास म्हणून नोंदणीकृत केलेला आहे. |
| १२. | डी. वाय. पाटील इंटरनॅशनल विद्यापीठ, पुणे, अधिनियम, २०१७ (२०१७ चा महा. ६३) अन्वये स्थापन केलेले डी. वाय. पाटील इंटरनॅशनल विद्यापीठ, पुणे. | डी. वाय. पाटील इंटरनॅशनल विद्यापीठ, पुणे मुख्यालय डी. वाय. पाटील इंटरनॅशनल विद्यापीठ, सेक्टर-२९, निगडी प्राधिकरण, आकुर्डी, जिल्हा पुणे, महाराष्ट्र-४११ ०४४. | डॉ. डी. वाय. पाटील प्रतिष्ठान. |
| १३. | जी. एच. रायसोनी विद्यापीठ, अमरावती, अधिनियम, २०१८ (२०१८ चा महा. २९) अन्वये स्थापन केलेले जी. एच. रायसोनी विद्यापीठ, अमरावती. | जी. एच. रायसोनी विद्यापीठ, अमरावती मुख्यालय अंजनगाव-बारी रोड, अमरावती-४४४ ७२७. | चैतन्य बहुउद्देशीय संस्था. |
| १४. | छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ, पनवेल, अधिनियम, २०१८ (२०१८ चा महा. ३२) अन्वये स्थापन केलेले छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ, पनवेल. | छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ, पनवेल, मुख्यालय जुना मुंबई-पुणे महामार्ग, शेडुंग टोलनाक्याजवळ, पनवेल. | सेंट विल्फ्रेडस एज्युकेशन सोसायटी. |
| १५. | विजयभूमी विद्यापीठ, रायगड अधिनियम, २०१८ (२०१८ चा महा. ७७) अन्वये स्थापन केलेले विजयभूमी विद्यापीठ, रायगड. | विजयभूमी विद्यापीठ, रायगड, मुख्यालय विजयभूमी विद्यापीठ, जामरुग, तालुका कर्जत, जिल्हा रायगड, महाराष्ट्र. | विजयभूमी एज्यकेशन फाउंडेशन, ४४७, ४ था मजला, १७ वा क्रॉस, सेक्टर चार, एच.एस.आर. लेआऊट, बंगलोर, भारत ५६० ०३४. |

**अनुसूची**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| १६. | सोमय्या विद्याविहार विद्यापीठ, मुंबई अधिनियम, २०१९ (२०१९ चा महा. ५) अन्वये स्थापन केलेले सोमय्या विद्याविहार विद्यापीठ, मुंबई. | सोमय्या विद्याविहार विद्यापीठ, मुंबई मुख्यालय सोमय्या विद्याविहार विद्यापीठ, विद्याविहार (पूर्व), मुंबई ४०० ०७७. | (एक) सोमय्या विद्याविहार संस्था, सोमय्या भवन, ४५-४७, महात्मा गांधी मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१. (दोन) के. जे. सोमय्या न्यास. सोमय्या भवन, ४५-४७, महात्मा गांधी मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१, आणि (तीन) सोमय्या न्यास. सोमय्या भवन, ४५-४७, महात्मा गांधी मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१. |
| १७. | डी. वाय. पाटील, विद्यापीठ, पुणे, अधिनियम, २०१९ (२०१९ चा महा. ६) अन्वये स्थापन केलेले डी. वाय. पाटील, विद्यापीठ, पुणे. | डी. वाय. पाटील, विद्यापीठ, पुणे, मुख्यालय डी. वाय. पाटील, विद्यापीठ, एमआयडीसी रोड, अंबी, तालुका मावळ, जिल्हा पुणे ४१० ५०६. | (एक) राजवीर फाउंडेशन सर्व्हे नंबर १२४ आणि १२६, डी. वाय. पाटील टेक्निकल कॅम्पस, अंबी, एमआयडीसी रोड, मावळ, तळेगाव दाभाडे, महाराष्ट्र ४१० ५०६. आणि (दोन) डी. वाय. पाटील, पाटील एज्युकेशनल अकॅडमी, पाटील बिल्डिंग, आदर्शनगर, एमआयजी कॉलनी समोर, वरळी, मुंबई. |
| १८. | श्री बालाजी विद्यापीठ, पुणे, अधिनियम, २०१९ (२०१९ चा महा. १२) अन्वये स्थापन केलेले श्री बालाजी विद्यापीठ, पुणे. | श्री बालाजी विद्यापीठ, पुणे, मुख्यालय श्री बालाजी विद्यापीठ, सर्व्हे क्रमांक ५५/२-७, मुंबई-बेंगलोर बायपाससमोर मौजे ताथवडे, तालुका मुळशी, पुणे-४११ ०३३, महाराष्ट्र. | श्री बालाजी सोसायटी, डी. एस. पार्क, ४८/२, १६/ब, मोहनवाडी, येरवडा, पुणे-४११ ००६. |
| १९. | रामदेवबाबा विद्यापीठ, नागपूर, अधिनियम, २०१९ (२०१९ चा महा. १३) अन्वये स्थापन केलेले रामदेवबाबा विद्यापीठ, नागपूर. | रामदेवबाबा विद्यापीठ, नागपूर, मुख्यालय रामदेवबाबा विद्यापीठ, रामदेव टेकडी, काटोल रोड, नागपूर ४४० ०१३. | श्री. रामदेवबाबा सार्वजनिक समिती, नागपूर, श्री. रामदेवबाबा, कमला नेहरू अभियांत्रिकी महाविद्यालय, प्रशासकीय इमारत, रामदेव टेकडी, काटोल रोड, नागपूर. |

**अनुसूची**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| २०. | एमजीएम विद्यापीठ, औरंगाबाद अधिनियम, २०१९ (२०१९ चा महा. २६) अन्वये स्थापन केलेले एमजीएम विद्यापीठ, औरंगाबाद, महाराष्ट्र. | एमजीएम विद्यापीठ, औरंगाबाद मुख्यालय एमजीएम विद्यापीठ, एन-६, सिडको, बायजीपुरा, औरंगाबाद ४३१ ००३, | महात्मा गांधी मिशन, १२, भाग्यनगर, नांदेड. |
| २१. | डी. वाय. पाटील कृषी व तंत्र विद्यापीठ, तळसंदे, कोल्हापूर अधिनियम, २०२० (२०२० चा महा. ३६) अन्वये स्थापन केलेले डी. वाय. पाटील कृषी व तंत्र विद्यापीठ, तळसंदे, कोल्हापूर. | डी. वाय. पाटील कृषी व तंत्र विद्यापीठ, तळसंदे, कोल्हापूर, मुख्यालय गट क्रमांक १९९ व ८५, तळसंदे, तालुका हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर, महाराष्ट्र ४१६ ११२. | डी. वाय. पाटील एज्युकेशन सोसायटी, ५वा मजला, अरोरा टावर्स-९, मोलेदिना रोड, पुणे. |
| २२. | निकमार विद्यापीठ, पुणे अधिनियम, २०२२ (२०२२ चा महा. ३६) अन्वये स्थापन केलेले निकमार विद्यापीठ, पुणे. | निकमार विद्यापीठ, पुणे मुख्यालय इमारत क्रमांक/भूखंड क्रमांक २५/१, एनआयए पोस्ट ऑफिस, बालेवाडी, तालुका हवेली, जिल्हा पुणे, महाराष्ट्र-४११ ०४५. | राष्ट्रीय बांधकाम व्यवस्थापन व संशोधन संस्था, वालचंद टेरेस, तळ मजला, एसी मार्केटसमोर, ताडदेव, मुंबई. |
| २३ | डॉ. पी. ए. इनामदार विद्यापीठ, पुणे अधिनियम, २०२२ (२०२२ चा महा. ३७) अन्वये स्थापन केलेले डॉ. पी. ए. इनामदार विद्यापीठ, पुणे. | डॉ. पी. ए. इनामदार विद्यापीठ, पुणे मुख्यालय २३९०-बी, के. बी. हिदायतुल्ला मार्ग, आझम कॅम्पस, कॅम्प, पुणे, महाराष्ट्र-४११ ००१. | महाराष्ट्र कॉस्मोपॉलीटन एज्युकेशन सोसायटी, पुणे २३९०-बी, के. बी. हिदायतुल्ला मार्ग, आझम कॅम्पस, कॅम्प, पुणे. |
| २४. | युनिव्हर्सल एआय विद्यापीठ, कर्जत अधिनियम, २०२२ (२०२३ चा महा. ३) अन्वये स्थापन केलेले युनिव्हर्सल, एआय विद्यापीठ, कर्जत. | युनिव्हर्सल एआय विद्यापीठ, कर्जत मुख्यालय, सर्वे नं. ५४/१ ते ५४/२७, ५५/०, ५७/०, ५८/०, ७/३, कुशीवल गाव, कुशीविली, तालुका कर्जत, जिल्हा रायगड-४१० ०२१. | स्ट्राईव्ह इंडिया एज्युकेशन फाऊंडेशन, १०५ रुणवाल व ओमकार स्क्वेअर, पहिला मजला, पूर्व द्रुतगती महामार्ग, शीव (पूर्व), मुंबई-४०० ०२२. |
| २५. | जेएसपीएम विद्यापीठ, पुणे, अधिनियम, २०२२ (२०२३ चा महा. ४) अन्वये स्थापन केलेले जेएसपीएम विद्यापीठ, पुणे. | जेएसपीएम विद्यापीठ, पुणे मुख्यालय गट क्रमांक ७१९/१ आणि ७१९/२, वाघोली, तालुका हवेली, जिल्हा पुणे, महाराष्ट्र-४१२ २०७. | जयवंत शिक्षण प्रसारक मंडळ, पुणे, सर्वे क्रमांक ८०, पुणे-मुंबई बायपास महामार्ग, ताथवडे, पुणे-४११ ०३३. |
| २६. | पिंपरी चिंचवड विद्यापीठ, पुणे अधिनियम, २०२२ (२०२३ चा महा. ५) अन्वये स्थापन केलेले पिंपरी चिंचवड विद्यापीठ, पुणे. | पिंपरी चिंचवड विद्यापीठ, पुणे मुख्यालय गट क्रमांक ४४, ४६, ४८, ४९ व ५०, साते, तालुका मावळ, जिल्हा पुणे, महाराष्ट्र-४१२ २०६. | पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट, सेक्टर क्र. २६, निगडी प्राधिकरण, पुणे-४११ ०४४. |

**अनुसूची**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| २७. | एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठ, सोलापूर, अधिनियम, २०२३ (२०२३ चा महा. ३८) अन्वये स्थापन केलेले एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठ, सोलापूर. | एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठ, सोलापूर, मुख्यालय एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठ, सोलापूर, गट क्रमांक ६६/८, ६७, ६९, ७०, ७१, ७२, ७३/ब/८/१ व ७३/३/अ, गाव केगाव, सोलापूर-पुणे महामार्ग, तालुका उत्तर सोलापूर, जिल्हा सोलापूर, महाराष्ट्र ४१३ २५५. | महाराष्ट्र अभियांत्रिकी व शैक्षणिक संशोधन अकादमी, पुणे, सर्व्हे क्रमांक १२४, एक्स सर्विसमन कॉलनी, पोस्ट ऑफिस, पौंड रोड, कोथरूड, पुणे ४११ ०३८. |
| २८. | डीईएस पुणे विद्यापीठ, पुणे, अधिनियम, २०२३ (२०२३ चा महा. ३९) अन्वये स्थापन केलेले डीईएस पुणे विद्यापीठ, पुणे. | डीईएस पुणे विद्यापीठ, पुणे, मुख्यालय मुकुंददास लोहिया अकादमी संकुल, बीएमसीसी, शिवाजीनगर, तालुका हवेली, जिल्हा पुणे, पुणे ४११ ००४. | फर्ग्युसन महाविद्यालय परिसर, प्रवेशद्वार क्र. ४, शिवाजीनगर, पुणे ४११ ००४ येथे नोंदणीकृत कार्यालय असणारी डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणे. |

**भाग - दोन**

(कलम ६(१) पहा)

| अ. क्र. (१) | विद्यापीठाचे नाव, ठिकाण व मुख्यालय (२) | प्रायोजक मंडळाचे नाव व पत्ता. (३) |
|---|---|---|
| १. | अलार्ड विद्यापीठ, पुणे, अलार्ड विद्यापीठ, पुणे, मुख्यालय सर्व्हे क्र. ४७ व ५०, अलार्ड नॉलेज पार्क, मारूंजी, राजीव गांधी आयटी पार्क जवळ, हिंजवडी, पुणे-४११ ०५७. | अलार्ड चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे, सर्व्हे क्र. ४७ व ५०, अलार्ड नॉलेज पार्क, मारूंजी, राजीव गांधी आयटी पार्क जवळ, हिंजवडी, पुणे-४११ ०५७. |
| २. | एसव्हीकेएम एनएमआयएमएस ग्लोबल विद्यापीठ, धुळे; एसव्हीकेएम एनएमआयएमएस ग्लोबल विद्यापीठ, धुळे मुख्यालय, सर्वे क्र. ४९९/१ ते ४-ए/१ व ४९९/१ ते ४-ए/२, गुरुद्वाराजवळ, मुंबई-आग्रा महामार्ग, तालुका धुळे, जिल्हा धुळे, महाराष्ट्र-४२४ ००१. | श्री विलेपार्ले केळवणी मंडळ, एसव्हीकेएम चे एनएमआयएमएस नवीन इमारत, १० वा मजला, पश्चिम विंग, व्ही. एल. मेहता मार्ग, विलेपार्ले (पश्चिम), मुंबई-४०० ०५६. |

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.